


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८५ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# आक्षेप घेणाऱ्यांचा नियमांचा अभ्यास नाही

## ठाकरे गटावर भाजपचा पलटवार; म्हणाले - सगळे पत्ते उघडले तर उत्कंठा राहणार नाही



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील 29 महानगरपालिकांमधील महापौरपदासाठी आज आरक्षण जाहीर करण्यात आले असून, या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत मंत्रालयात आरक्षण सोडत पार पडली. या सोडतीत मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख महानगरपालिकांसह छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, नागपूर आणि नांदेड-वाघाळा या महापालिकांचे महापौरपद खुल्या वर्गातील महिलांसाठी आरक्षित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी सर्वसाधारण महिला उमेदवारासाठी आरक्षण जाहीर झाल्याने, देशातील सर्वात मोठ्या महापालिकेवर आता महिला नेतृत्व असणार, हे जवळपास निश्चित झाले आहे.

मुंबई महापालिकेच्या आरक्षणाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. कारण मुंबई महापालिका ही आर्थिकदृष्ट्या देशातील सर्वात श्रीमंत महापालिका मानली जाते, तसेच महापौरपदाला राजकीय आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून मोठे महत्त्व आहे. आरक्षण जाहीर होताच, मुंबईतील नगरसेवकांच्या संख्याबळाचा विचार करता, महापौरपद महायुतीमधील भाजपकडे जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे मुंबईत महिला महापौर तर असणारच, पण त्या भाजपकडून असण्याची शक्यता अधिक असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

आरक्षण जाहीर झाल्यानंतर भाजप नेते अमित साटम यांनी या निर्णयावर प्रतिक्रिया देताना महिला नेतृत्वाचा ठामपणे पुरस्कार केला. ते म्हणाले की, मुंबई शहराला योग्य दिशा देण्यासाठी, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्यासाठी आणि शहराची सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी महिला नेतृत्व पुढे येत आहे, याचा भाजपला अभिमान आहे. मुंबईची तुंबई होऊ देणार नाही. विकास सुरू असतानाच मातृशक्ती अधिक सक्षमपणे पुढे येईल, असे म्हणत त्यांनी महिला महापौराच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. येत्या दोन ते तीन दिवसांत भाजप आणि शिवसेनेच्या गटांच्या स्वतंत्र बैठकाही होतील, त्यानंतर सभागृह नेता निवडीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि त्याच दिवशी अधिकृत नोंदणी करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापौरपदासाठी नेमकी कोणत्या महिला नगरसेविकेचे नाव पुढे येईल, याबाबत विचारले असता अमित साटम यांनी सध्या उत्सुकता कायम ठेवण्याचे संकेत दिले. सगळे पत्ते आत्ताच उघडले तर उत्कंठा राहणार नाही, असे सूचक विधान करत त्यांनी निर्णय योग्य वेळी जाहीर केला जाईल, असे सांगितले. त्यामुळे भाजपकडून कोणत्या महिला नगरसेविकेला महापौरपदाची संधी दिली जाणार, याबाबत चर्चा सुरू झाली असून, पुढील काही दिवसांत या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, मुंबई महापौरपदाच्या आरक्षणावरून ठाकरे गटाच्या नेत्यांनी आक्षेप नोंदवला होता. या आक्षेपांवर उत्तर देताना अमित साटम यांनी ठाकरे गटावर थेट टीका केली. आक्षेप घेणाऱ्यांचा नियमांचा अभ्यास नाही. त्यांनी संपूर्ण प्रक्रिया समजून घेतलेली नाही, असा आरोप त्यांनी केला.

## ४ वर्षाच्या चिमुकलीवर स्कूल व्हॅन चालकाकडून संतापजनक कृत्य

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

बदलापूर शहर पुन्हा एकदा चिमुकलीवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेने हादरलं आहे. याआधी बदलापूरच्या एका नामांकीत शाळेत चिमुकलीवर लैंगिक अत्याचाराची घटना समोर आली होती. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीचा एन्काउंटर केला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा अशी घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. बदलापुरात 4 वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्कूल व्हॅन चालकाने चिमुरडीवर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. तर चिमुकलीची सध्या वैद्यकीय तपासणी सुरु असल्याची माहिती आहे.



ही घटना समोर आल्यानंतर शहरात एकच खळबळ उडाली आहे. संबंधित स्कूल व्हॅनची तोडफोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला नेत्या संगीता चेंदवनकर यांच्याकडून संबंधित व्हॅनवर दगडफेक करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, बदलापूर पोलीस ठाण्यात तणावाचं वातावरण असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हा चिमुकलीला स्कूल व्हॅनमधून शाळेत घेऊन जात होता. या दरम्यान त्याने चिमुकलीसोबत स्कूल व्हॅनमध्ये गैरवर्तन केले. यावेळी आरोपीने पीडित चिमुकलीला मारहाण देखील केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे हे प्रकरण खूप भयंकर असल्याचे संकेत मिळत आहेत. पोलिसांनी घटनेचं गांभीर्य ओळखून स्कूल व्हॅन चालकाला अटक केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या संगीता चेंदवणकर या घटनेनंतर प्रचंड आक्रमक झाल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून प्रशासनाने काही नियम तयार केले होते. त्या नियामांचे पालन का झाले नाही? असा जाब त्यांनी विचारला आहे. दरम्यान, पोलीस ठाण्याच्या आवारात संबंधित स्कूल व्हॅन आली तेव्हा चेंदवणकर आणि त्यांच्यासोबतच्या काही महिला कार्यकर्त्यांनी त्या गाडीची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला.

संबंधित प्रकरणामुळे बदलापुरातील वातावरण तापण्याची शक्यता आहे. या प्रकरणी आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली जात आहे. तसेच अशा प्रकारचे गैरप्रकार वारंवार कसे घडू शकतात? असा प्रश्न उपस्थित होत आहे. अशा प्रकारचं कृत्य करणाऱ्यांवर कठोरात कठोर शिक्षेची तरतुद व्हावी, जेणेकरुन असे कृत्य थांबतील, अशी मागणी जनसामन्यांकडून केली जात आहे.

## छत्रपती संभाजीनगरचा महापौर कोण? भाजपमध्येच नावांची रस्सीखेच

**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

- सावे-कराडांची भूमिका निर्णायक; महापौरपदासाठी संघर्ष तीव्र; आठ जणांची जोरदार चर्चा

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर महापालिकेत महापौरपदासाठीचा मार्ग अखेर मोकळा झाला असून आता सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवाराला महापौर होण्याची संधी उपलब्ध झाली आहे. महापालिकेचा निकाल जाहीर झाला असला तरी खऱ्या अर्थाने सत्तासंघर्षाला आता सुरुवात झाली आहे. कारण भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी महापौरपदासाठी कोणता चेहरा पुढे येणार, याबाबत पक्षांतर्गत हालचाली वेगाने सुरू आहेत. विशेषतः महापौरपदाच्या उमेदवाराची निवड करताना मंत्री अतुल सावे कोणत्या नावाला पसंती देतात, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या निवडणुकीत भाजपने जोरदार कामगिरी करत 57 नगरसेवक निवडून आणले आहेत. बहुमतासाठी भाजप केवळ एका जागेने कमी पडला असला, तरी प्रत्यक्ष राजकीय गणित पाहता स्वतंत्रपणे 'कमळ' चिन्हाचा महापौर बसण्याचे चित्र सध्या स्पष्ट दिसत आहे. भाजपला पाठिंबा देणारा एक नगरसेवक नेमका कोण असेल, हे अद्याप जाहीर झालेले नसले तरी, शहराचा कारभार सक्षमपणे आणि स्थिरपणे हाताळू शकणाऱ्या उमेदवारालाच महापौरपदी बसवावे, अशी भूमिका समर्थकांकडून मांडली जात आहे.

## NCP च्या दोन्ही गटांचे विलीनीकरण होणार का?

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

- सुनील तटकरे म्हणाले - आम्ही उत्सुक नाही, पण परिस्थिती उद्भवली तर निर्णय घेतला जाईल



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाविषयी एक सूचक विधान केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस या प्रकरणी उत्सुक नाही, पण तशी एखादी परिस्थिती उद्भवली तर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सत्ताधारी एनडीए सोबत असल्याची बाबही आवर्जून निदर्शनास आणून दिली. राज्यातील महापालिका निवडणुकीत शरद पवार व अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांची अत्यंत सुमार कामगिरी झाली. अनेक ठिकाणी या पक्षांना मानहाणीकारक पराभव पत्करावा लागला. यामुळे या दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाच्या चर्चेने चांगलाच जोर धरला आहे. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांनी गुरुवारी 'द इंडियन एक्सप्रेस'शी बोलताना उपरोक्त विधान केले आहे. ते म्हणाले, मी याविषयी फार काही बोलू शकत नाही. कारण, विलीनीकरण हे अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. आम्ही भाजपप्रणित एनडीएचा भाग आहोत हे या प्रकरणी प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागेल.

## नागपूर मनपाची धुरा महिलेच्या हाती, शहराला मिळणार स्त्री महापौर

### शहरात राजकीय हालचालींना वेग

**नागपूर : (समर्थ गांवकरी)**



नागपूर महापालिका निवडणुकीत 102 जागा जिंकत भाजपने चौथ्यांदा सत्ता मिळविली. त्यानंतर पुढील अडीच वर्षांसाठी महिला महापौर शहराची प्रथम नागरिक म्हणून नागपूरकरांचे प्रतिनिधित्व करणार आहे. राज्य सरकारकडून गुरुवारी काढण्यात आलेल्या सोडतीनंतर शहराचे महापौरपद खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे शहराचे 55 वे महापौर होण्याचा मान महिला नगरसेविका भूषवणार असल्याचे निश्चित झाले आहे. राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडून गुरुवारी 29 महापालिकांसाठी महापौरपदाचे आरक्षण काढण्यात आले. विशेष म्हणजे, नागपूर महापालिकेची मुदत संपण्याच्या शेवटच्या अडीच वर्षांत महापौरपद हे खुल्या प्रवर्गासाठीच आरक्षित होते. त्यातच गेल्या अडीच दशकांहून अधिक काळापासून अनुसूचित जातीकरिता महापौरपदाचे आरक्षण न निघाल्याने यंदा ते या प्रवर्गाचे निघेल, अशी अपेक्षा होती. एरवी महापौरपदाचे आरक्षण निवडणुकांपूर्वीच काढले जाते. दरम्यान, यंदा निवडणुकानंतर आरक्षण निघाल्याने निवडून आलेल्या प्रत्येकाचे लक्ष या सोडतीकडे लागले होते. 'खुला प्रवर्ग महिला' असे आरक्षण निघाल्याने आता सत्ताधारी भाजपकडून कोणाला संधी देण्यात येते, याची चांगलीच उत्सुकता आहे. 151 सदस्यसंख्या असलेल्या नागपूर महापालिकेत भाजपचे 102 नगरसेवक निवडून आले आहेत. यात 54 महिला नगरसेविका आहेत. यात अनेक पहिल्यांदा निवडून आलेल्या आहेत, तर काहींची निवडून येण्याची ही दुसरी किंवा तिसरी वेळ आहे. आरक्षणाची सोडत जाहीर झाल्यानंतर भाजपकडून नेमके कोण पुढील महापौर होणार, याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्याचबरोबर नव्या महापौरांची निवड करताना विधानसभानिहाय प्राधान्य देण्यात येते. जातीय समीकरणे व इतर बाबींचा विचार करून पक्षाकडून नवोदितांना संधी देण्यात येणार की अनुभवी नगरसेविकांना जबाबदारी देण्यात येणार, याची उत्सुकता येत्या काळात दूर होणार आहे. 2017 मध्ये पहिल्या अडीच वर्षांत महापौरपदी नंदा जिचकार या होत्या, तर त्यानंतरच्या अडीच वर्षांत संदीप जोशी आणि दयाशंकर तिवारी यांनी प्रत्येकी सव्वा वर्ष हा कार्यभार सांभाळला. आता चार वर्षांनंतर महापालिकेत पुन्हा एकदा नगरसेवक आल्याने प्रशासकांचा कार्यकाळ संपुष्टात येणार आहे. नव्या महापौरांची निवड झाल्यानंतर नियमित कारभाराला सुरुवात होणार आहे.

## थोडक्यात...

### 'बाप्या'ने जिंकला सर्वोच्च मराठी चित्रपट पुरस्कार

पुणे (समर्थ गांवकरी) : पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) 'संत तुकाराम सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपटा'चा पुरस्कार यंदा समीर तिवारी दिग्दर्शित 'बाप्या' या चित्रपटाने पटकावला. तर, 'प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट' पुरस्कार 'द एलिशियन फील्ड' या चित्रपटाने पटकावला. पुणे फिल्म फाउंडेशन, राज्य सरकारचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 24 व्या 'पिफ'चा समारोप गुरुवारी झाला. यावेळी स्पर्धेतील विजेत्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. याप्रसंगी महाराष्ट्र चित्रपट आणि सांस्कृतिक रंगभूमी विकास प्राधिकरणाचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, प्रसिद्ध अभिनेते जॅकी श्रॉफ, महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, पुणे फिल्म फाउंडेशनचे विश्वस्त मोहन आगाशे, सतीश आळेकर, चित्रपट निवड समितीचे सदस्य समर नखाते आदी उपस्थित होते.

### अमित शाह नांदेडला येणार

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी) : श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे 24 व 25 जानेवारी रोजी "हिंद दी चादर' या ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या राज्यस्तरीय समागम समितीच्या (महाराष्ट्र राज्य) पदाधिकाऱ्यांनी या वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाचे निमंत्रण केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांना देण्यात आले. त्यानुसार, शाह यांनी निमंत्रण स्वीकारत सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. राज्यस्तरीय समागम समितीच्या (महाराष्ट्र राज्य) पदाधिकारी नवी दिल्ली येथे गेले होते. त्यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शाह यांची सदिच्छा भेट घेत त्यांना सोहळ्याचे निमंत्रण दिले. शाह यांनी निमंत्रणाचा स्वीकार करत 25 जानेवारी रोजी दुपारी 2 ते 5 या वेळेत कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहू, असे सांगितले.

## ५० हजार शेतकऱ्यांच्या जिद्दीसमोर प्रशासन नमले

### जिल्हाधिकाऱ्यांकडून मागण्यांवर समयबद्ध लेखी आश्वासन, पालघरचा लाँग मार्च यशस्वी

**पालघर : (समर्थ गांवकरी)**

ठाणे-पालघर जिल्ह्यामध्ये होत असलेले वाढवण व मुरबे बंदर रद्द करा, कसत असलेल्या जमिनी शेतकऱ्यांच्या नावे करा, स्मार्ट मीटर रद्द करा इत्यादी मागण्यांसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने १९ ते २१ जानेवारी २०२६ या काळात चारोटी ते पालघर असा ५०,००० शेतकऱ्यांचा जबरदस्त लाँग मार्च काढण्यात आला. दोन दिवस सुमारे ६० किमी पायी चालत शेतकरी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले. लाँग मार्चच्या तिसऱ्या दिवशी तब्बल ७ तास स्थानिक मागण्यांबाबत पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड आणि सर्व संबंधित खात्यांचे अधिकारी यांच्यासोबत माकपच्या शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा केली. या चर्चेनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या सहीने मोर्चाच्या मागण्यांवर समयबद्ध लेखी आश्वासने दिल्यानंतरच २१ जानेवारीला रात्री उशिरा हे आंदोलन स्थगित केल्याची घोषणा हजारोंच्या सभेसमोर माकपचे नेते डॉ. अशोक ढवळे, आमदार विनोद निकोले व किरण गहला यांनी विजयाच्या प्रचंड जल्लोषात केली. या आंदोलनाला अखिल भारतीय किसान सभा, सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया, आणि आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच या संघटनांनी संपूर्ण व सक्रिय पाठिंबा दिला होता.



या जबरदस्त आंदोलनात पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा, वसई व पालघर या आठही तालुक्यांतून प्रत्येकी हजारों श्रमिक स्त्री-पुरुष या आंदोलनात त्वेषाने सहभागी झाले होते. त्यातील बहुसंख्य जण हे अर्थात आदिवासी होते. सरकारशी झालेल्या वाटाघाटींमध्ये वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणीत येत असलेल्या समस्यांबद्दल सकारात्मक भूमिका जिल्हाधिकारी यांनी घेतली. ३० एप्रिल २०२६ पर्यंत सर्व प्रलंबित दावे निकाली काढण्याचे त्यांनी मान्य केले.

## मुंबईचा महापौर वाजतगाजत डौलाने बसेल

- मंत्री आशिष शेलार यांचा ठाकरे बंधूंना टोला
- आरक्षणाची सोडत नियमानुसार झाल्याचा दावा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



भाजप नेते तथा मंत्री आशिष शेलार यांनी मुंबईत महायुतीचा महापौर वाजतगाजत डौलाने बसेल असे विधान करत ठाकरे बंधूंना टोला हाणला आहे. महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत ही नियमानुसार झाली आहे. आता नियमानुसार महायुतीचा महापौर मुंबई महानगरपालिकेत बसेल, असे ते म्हणाले.

मुंबईसह राज्यातील 29 महापालिकांची गत 15 जानेवारी रोजी निवडणूक झाली. त्यानंतर आज या महापालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत झाली. त्यात मुंबईचे महापौरपद सर्वसारण महिला प्रवर्गाला सुटले आहे. या सोडतीवेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने गैरप्रकार झाल्याचा आरोप केला. पण सरकारने तो जोरकसपणे फेटाळून लावला. या पार्श्वभूमीवर आशिष शेलार यांनी ठाकरे बंधूंना टोला हाणत मुंबईचा महापौर वाजतगाजत डौलाने बसेल असा दावा केला.

आशिष शेलार सोडतीनंतर पत्रकारांशी बोलताना म्हणाले, आरक्षणाची सोडत ही प्रक्रियेचा भाग असते. त्या प्रक्रियेनुसार जी काही आरक्षण सोडत झाली, ती कायद्यानुसार, परंपरेनुसार व नियमानुसार झाली. आता नियमानुसार महायुतीचा महापौर मुंबईत बसेल. वाजगतगाजत बसेल. मुंबईकरांच्या आशीर्वादाने बसेल. मराठी माणसांच्या सेवेसाठी बसेल. संपूर्ण मुंबईच्या विकासासाठी बसेल. महायुतीचा महापौर डौलाने बसेल, असे ते म्हणाले. उल्लेखनीय बाब म्हणजे ठाकरे बंधूंनी महापालिका निवडणुकीपूर्वी मराठी माणसांना हिंदीच्या सक्तीविरोधात आयोजित करण्यात आलेल्या सभेसाठी वाजतगाजत येण्याचे आवाहन केले होते.

# लोम्बार्ड अभियंत्यांना प्रशिक्षण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

त्यांच्या सध्या सुरू असलेल्या झिरो फॅटॅलिटी कॉरिडॉर (ZFC) उपक्रमांतर्गत, सेव्हलाइफ फाउंडेशनने २० जानेवारी २०२६ रोजी मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अभियंते प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केली. या उपक्रमाचा उद्देश उच्च-जोखीम असलेल्या रस्ते कॉरिडॉरमध्ये सुरक्षा पद्धती मजबूत करून टाळता येण्याजोग्या रस्ते अपघातातील मृत्यू कमी करणे आहे.
आयसीआयसीआय लोम्बार्डच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) कार्यक्रमांतर्गत समर्थित, प्रशिक्षणात सुरक्षित रस्ते कार्यस्थळ व्यवस्थापनाचे सैद्धांतिक आणि व्यावहारिक पैलू समाविष्ट होते, ज्याचा उद्देश सक्रिय बांधकाम क्षेत्रांमध्ये सुरक्षा मानके सुधारणे आणि अपघाताचे धोके कमी करणे हा होता. या कार्यक्रमाला एमएसआरडीसीच्या कार्यकारी अभियंता श्रीमती शैलजा पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमात बोलताना त्या म्हणाल्या, "रस्ता सुरक्षा व्यवस्थापनात प्रत्यक्ष कृती अत्यंत महत्त्वाची आहे. एक्सप्रेसवेवर बसवलेल्या एसओएस सिस्टीम व्यतिरिक्त, अपघातग्रस्तांना मूलभूत वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी प्रथमोपचार पेट्या सुरू करण्याचा मी प्रस्ताव ठेवतो, ज्यामुळे अपघातांचे परिणाम कमी होतील."



### प्रशिक्षणातील प्रमुख क्षेत्रांमध्ये हे समाविष्ट होते

- अपघाताचे धोके कमी करण्यासाठी कार्यक्षेत्रांचे नियोजन आणि व्यवस्थापन
- वाहतूक व्यवस्थापन योजना, अडथळे आणि सूचना फलकांचा प्रभावी वापर
- केस स्टडीज सुरक्षित वळसा पद्धती आणि घटना प्रतिबंध
- सुरक्षित ऑन-ग्राउंड पद्धतींवर परस्परसंवादी सत्रे
- कार्यक्षेत्र व्यवस्थापनातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींवर चर्चा

९४.५ किमी लांबीचा, मुंबई-पुणे एक्सप्रेसवे हा भारतातील पहिला ६-लेन महामार्ग आहे, जो संपूर्ण राज्यात कनेक्टिव्हिटी आणि आर्थिक विकास सुधारतो.२०१६ मध्ये, जेव्हा सेव्हलाइफ फाउंडेशनने त्यांच्या झिरो फॅटॅलिटी कॉरिडॉर (ZFC) उपक्रमांतर्गत या कॉरिडॉरवर काम सुरू केले तेव्हापासून ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत, रस्ते अपघातातील मृतांमध्ये ५८% घट झाली. अलीकडेच, महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने शेअर केलेल्या आकडेवारीनुसार, एक्सप्रेसवेने जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान एकूण रस्ते अपघातातील मृतांमध्ये २६% घट नोंदवली आहे.

## सर्वात आवडता टीव्ही शो आता मोठ्या पडद्यावर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

जानेवारी 2026: भारतातील सर्वात लोकप्रिय टेलिव्हिजन कॉमेडी आता मनोरंजनाचा स्तर आणखी उंचावण्यासाठी सिद्ध झाली आहे आणि ती ही थेट मोठ्या पडद्यावर. तब्बल दहा वर्षांहून अधिक काळ प्रेक्षकांचे मनोरंजन केल्यानंतर 'भाभीजी घर पर हैं!' ही मालिका आता आपल्या विश्वाचा विस्तार करत चित्रपटाच्या रूपात सादर होत आहे—'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन'. झी स्टुडिओज आणि एडिट II यांनी आज चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित केला असून तो प्रेक्षकांना नेमके जे अपेक्षित आहे तेच देण्याचे वचन देतो — न थांबणारी कॉमेडी, गोंधळ आणि धमाल मनोरंजनाचा पूर्ण डोस! ट्रेडमार्क विनोद, रंगतदार नाट्य आणि अतिशयोक्ती, मोठ्या पडद्याला साजेशा प्रसंगांनी भरलेला हा ट्रेलर प्रेक्षकांना एका झपाट्याने पुढे जाणाऱ्या, खळखळून हसवणाऱ्या सिनेमॅटिक प्रवासाची झलक दाखवतो. यात प्रेक्षकांच्या परिचयाची ही पात्रे पुन्हा एकदा अनपेक्षित आणि हास्यास्पद परिस्थितींमध्ये अडकताना दिसतात. झी सिनेमा, संजय कोहली आणि बिनैफर कोहली यांची निर्मिती आणि शशांक बाली यांचे दिग्दर्शन असलेला हा चित्रपट झी स्टुडिओज् 6 फेब्रुवारी 2026 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित करणार आहे.

आपल्या मूळ आयकॉनिक शोच्या आत्म्याशी एकरूप राहत पण सिनेमासाठी त्याचा आवाका वाढवत 'भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन' हा चित्रपट भारतीय पॉप कल्चरचा भाग बनलेल्या या प्रेक्षकप्रिय पात्रांना पुन्हा एकत्र आणतो. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये रोमान्स, गोंधळ, ॲक्शन, नवीन खलनायक आणि दुप्पट धमाल यांची झलक देत, हा चित्रपट मोठ्या पडद्यावर अनुभवावा असा थिएटर-फर्स्ट कॉमेडी स्पेक्टॅकल असल्याचे स्पष्ट होते. शुभांगी अत्रे पुन्हा एकदा आयकॉनिक अंगूरी भाभीजींची भूमिका अगदी सहजतेने साकारते, तर विदिशा श्रीवास्तव त्यात अनीता भाभीजी म्हणून मोहकता आणि ग्लॅमरची भर घालते.




## 'अरुधा हायब्रिड लॉन्ग-शॉर्ट फंड' सुरू

25 YEARS Bandhan AMC

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

बंधन म्युच्युअल फंडाच्या अरुधा एसआयएफने आपली पहिली एसआयएफ स्ट्रॅटेजी 'अरुधा हायब्रिड लॉन्ग-शॉर्ट फंड' सुरू करण्याची घोषणा केली आहे. ही एक इंटरव्हल इन्व्हेस्टमेंट स्ट्रॅटेजी असून, जोखीम व्यवस्थापनासोबत करानंतर चांगले परतावे देणे, हा तिचा मुख्य उद्देश आहे.

या स्ट्रॅटेजीअंतर्गत अल्प ते मध्यम कालावधीच्या डेट आणि मनी मार्केट इन्स्ट्रुमेंट्समध्ये ६५ टक्क्यांपर्यंत गुंतवणूक करण्याचा मानस आहे. तर पूर्णपणे हेज्ड, मार्केट-न्यूट्रल इक्विटी पोझिशनमध्ये किमान ३५ टक्के वाटा राखला जाणार आहे. स्ट्रॅटेजी डॉक्युमेंटनुसार, या योजनेत डेट व मनी मार्केट इन्स्ट्रुमेंट्स तसेच इक्विटी इन्स्ट्रुमेंट्समध्ये किमान ३५ टक्के आणि कमाल ६५ टक्के गुंतवणूक करता येईल. तसेच २५ टक्क्यांपर्यंत शॉर्ट, अनहेज्ड डेरिव्हेटिव्ह्ज एक्सपोजर घेण्याची मुभा आहे. या स्ट्रॅटेजीतील डेट एक्सपोजर एक ते चार वर्षांच्या कालावधीत ॲक्टिव्ह ड्युरेशन मॅनेजमेंट असलेल्या इन्स्ट्रुमेंट्समध्ये असेल. एए+/एए रेटिंग असलेल्या इन्स्ट्रुमेंट्समध्ये गुंतवणूक करता येईल, मात्र ती एकूण पोर्टफोलिओच्या १० टक्क्यांपर्यंत मर्यादित असेल. उर्वरित गुंतवणूक एएए-रेटेड किंवा सॉव्हरिन सिक्युरिटीजमध्ये केली जाईल. या डेट वाटपाचा उद्देश स्थैर्य, तरलता आणि एक्रुअल उत्पन्न उपलब्ध करून देणे हा आहे.

## सीएस द्वारकानाथ चेनूर उपाध्यक्ष

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (आयसीएसआय) ने १९ जानेवारी २०२६ पासून लागू होणाऱ्या २०२६ या वर्षासाठी सीएस पवन जी चंदक यांची अध्यक्ष आणि सीएस द्वारकानाथ चेनूर यांची उपाध्यक्ष म्हणून निवड केली. सीएस पवन जी चंदक, ज्यांना कॉर्पोरेट आणि संबंधित कायद्यांमध्ये दोन दशकांहून अधिक अनुभव आहे, त्यांनी यापूर्वी २०२५ मध्ये आयसीएसआयचे उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे आणि प्रादेशिक व शाखा स्तरावर अनेक नेतृत्व पदे भूषवली आहेत. सीएस द्वारकानाथ चेनूर, जे आयसीएसआयचे फेलो सदस्य आणि दिवाळखोरी व्यावसायिक आहेत, त्यांच्याकडे कॉर्पोरेट कायदे आणि दिवाळखोरीच्या बाबींमध्ये व्यापक अनुभव आहे.

## ओप्पो इंडियाने प्रीमियम रेनो१५ सिरीज केली लाँच

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ओप्पो इंडियाने आज त्यांची प्रीमियम रेनो१५ सिरीज लाँच केली, त्यामध्ये रेनो१५ प्रो, रेनो१५ प्रो मिनी आणि रेनो१५ ही तीन प्रकारची विशेष आकर्षणे आहेत. तरुण प्रवासी आणि उत्साही फोटोग्राफरसाठी तयार केलेल्या या सिरीजमध्ये प्रगत कॅमेरा सिस्टम, बुद्धिमान एआय आणि अचूक डिझाइनचे मिश्रण आहे. नैसर्गिक घटकांनी प्रेरित रंगीत फिनिश आणि अशा प्रकारच्या पहिल्या प्रकारच्या होलोफ्यूजन तंत्रज्ञानासह, रेनो१५ सिरीजमध्ये कॉम्पॅक्ट, एर्गोनॉमिक फॉर्म फॅक्टर आणि दणकट बिल्ड क्वालिटी आहे. रेनो१५ प्रो आणि रेनो१५ प्रो मिनी २०० एमपी कॅमेरासह फोटोग्राफीला पुढे जात असून त्यामध्ये स्तंभित करणारी क्लॅरिटी आहे. त्याच्या जोडीला ५० एमपी ३.५ एक्स ऑप्टिकल झूम लेन्स,




१२० एक्स पर्यंत डिजिटल झूम, प्युरटोन इमेजिंग टेक्नॉलॉजी आणि एआय एडिटिंग टूल्सही आहेत.

रेनो१५ सिरीजच्या लाँचबद्दल बोलताना ओप्पो इंडियाचे कम्युनिकेशन्स प्रमुख गोल्डी पटनायक म्हणाले, "भारतात १० कोटींपेक्षा अधिक ओप्पो वापरकर्ते आहेत, त्यामुळे ग्राहकांच्या अपेक्षा प्रीमियम अनुभवांच्या दिशेने, विशेषतः कॅमेरा सिस्टम, अंतर्ज्ञानी एआय, विशिष्ट डिझाइन भाषा आणि वापरकर्ता अनुभवाच्या दिशेने, कशा विकसित झाल्या आहेत हे आम्ही जवळून अनुभवले आहे. रेनो सिरीजची सातत्यपूर्ण वाढ ही या ट्रेंडसाठी आमची कटिबद्धता आहे कारण ग्राहक किरकोळ अपग्रेडपेक्षा वास्तव जगातील मूल्य देणारी उपकरणांच्या शोधात आहेत. रेनो१५ सिरीजद्वारे आम्ही त्या विश्वासावर उभारी घेत असून लक्षणीयरीत्या प्रगत इमेजिंग सिस्टम, सखोल एआय क्षमता आणि मजबूत अष्टपैलू कामगिरी देत आहोत. तरुण भारतीय कसे प्रवास करतात, त्यांचे क्षण कसे तयार करतात आणि कॅप्चर करतात यानुसार त्यांची रचना करण्यात आली आहे."

रेनो१५ प्रो हा समुद्राला द्रवरूप सोन्याच्या चादरीत बदलणाऱ्या सूर्यास्ताच्या वेळेसच्या समुद्रकिनाऱ्यांच्या सोनेरी रंगछटांनी प्रेरित अशा सनसेट गोल्ड रंगात आणि चहा व कॉफीच्या उबदारतेमध्ये मूळ असलेल्या कोको ब्राउन रंगात येतो. रेनो१५ प्रो मिनीमध्ये कोको ब्राउन रंग कायम आहे. त्यात होलोफ्यूजन तंत्रज्ञान आणि क्रिस्टल पिंक प्रकाराद्वारे साध्य केलेला त्रिमितीय रिबन पॅटर्न हे खास आकर्षण असलेला ग्लेशियर व्हाइट रंग आणि आणि क्रिस्टल पिंक प्रकाराची भर पडली आहे. रात्रीचे आकाश आणि ऑरोरासारख्या घटनांमधून प्रेरणा घेतलेल्या ग्लेशियर व्हाइट, ट्वायलाइट ब्लू आणि ऑरोरा ब्लूसह रेनो१५ची लाईनअप पूर्ण होती.

रेनो१५ प्रो च्या १२ जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटची किंमत ६७,९९९ रुपये आणि १२ जीबी + ५१२ जीबी व्हेरिएंटची किंमत ७२,९९९ रुपये आहे. रेनो१५ प्रो मिनी १२ जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटची किंमत ५९,९९९ रुपये आणि १२जीबी + ५१२ जीबी व्हेरिएंटची किंमत ६४,९९९ रुपये आहे.

## अझीम प्रेमजी विद्यापीठाने शिक्षक आणि शिक्षणतज्ञांसाठी पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया केली सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

Azim Premji University

अझीम प्रेमजी विद्यापीठाने त्यांच्या बंगळूरु विद्यापीठ प्रांगणात (कॅम्पस) शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांसाठी पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू केल्याची घोषणा केली आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण (अर्ली चाइल्डहूड एज्युकेशन) अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदविका, शैक्षणिक मूल्यमापनामध्ये पदव्युत्तर पदविका, अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांना शिकवण्यासाठी पदव्युत्तर पदविका आदी अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख १२ फेब्रुवारी २०२६ आहे. हा एक वर्षाचा अर्धवेळ पदविका अभ्यासक्रम असून, यामध्ये सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक शिक्षणाचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम मिश्र स्वरुपात (ऑनलाइन आणि कॅम्पसमध्ये प्रत्यक्ष सत्रे) राबवला जाईल. नियमित शालेय क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांच्या उच्च-गुणवत्तेच्या व्यावसायिक विकासासाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या लवचिक रचनेमुळे कार्यरत शिक्षकांना आपले काम सांभाळून शिक्षण घेणे शक्य होणार आहे. हा पदविका अभ्यासक्रम शिक्षण क्षेत्रातील कार्यरत शिक्षकांसाठी तयार करण्यात आला आहे. त्यासाठी शालेय शिक्षक आणि शिक्षक-प्रशिक्षक, विशेष शिक्षक, शालेय पदाधिकारी, सरकारी संस्था, खासगी संस्था किंवा शालेय प्रणालीशी संबंधित स्वयंसेवी संस्थांमध्ये काम करणारे शिक्षक अर्ज करू शकतात. अर्जदारांकडे किमान दोन वर्षांचा संबंधित कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एज्युकेशनचे संचालक अंकुर मदन म्हणाले, "हे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना पूर्व प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, अध्ययन अक्षमता आणि मूल्यमापन यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातील ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टीकोन प्रदान करतात. हे अभ्यासक्रम अशा प्रकारे डिझाईन करण्यात आले आहेत की, ज्यामुळे कार्यरत शिक्षक/ शिक्षणतज्ज्ञांना त्यांचे शिक्षण मुले आणि सहकाऱ्यांबरोबरच्या दैनंदिन व्यवहारात वापरता येईल. तसेच, स्वतःच्या कामातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा चिकित्सकपणे विचार करण्यास आणि त्यांची उत्तरे शोधण्यासही हे अभ्यासक्रम त्यांना प्रोत्साहित करतात."

### अभ्यासक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये

- एक वर्षाचा, अर्धवेळ मिश्र स्वरुपाचा पदविका अभ्यासक्रम (हायब्रीड फॉरमॅट).
- ऑनलाइन वर्ग आणि बंगळूरु विद्यापीठ प्रांगणात प्रत्यक्ष सत्रांचा समावेश.
- प्रत्येक पदविका अभ्यासक्रमात प्रत्येकी १२ आठवड्यांच्या चार प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा समावेश.
- पूर्ण पदविका अभ्यासक्रम किंवा वैयक्तिक प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी नोंदणी करण्याची लवचिक सुविधा.

## ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

टोयोटा किर्लोस्कर मोटर (TKM) ने आज ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला लॉन्च करण्याची घोषणा केली. अशाप्रकारे टोयोटाने भारताच्या बॅटरी इलेक्ट्रिक वाहन सेगमेन्टमध्ये पदार्पण केले आहे. इलेक्ट्रिफाईड मोबिलिटीत टोयोटाच्या जागतिक नैपुण्यासह, ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेलामध्ये बोल्ड SUV स्टाइलिंग, प्रीमियम केबिन अनुभव तसेच आत प्रशस्त जागा, प्रगत टेक्नॉलॉजी आणि स्मूद, विश्वसनीय इलेक्ट्रिक परफॉर्मन्सची खात्री आहे. अर्बन SUV संकल्पनेतून जन्मलेली ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला, टोयोटाच्या मल्टीपाथ दृष्टिकोनास पुढे घेऊन जाण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, जे ग्राहकांना इलेक्ट्रिफाईड पॉवरट्रेन टेक्नॉलॉजीचे अधिक पर्याय देते आणि भारताच्या एनर्जी सिक्युरिटी आणि डीकार्बनायझेशनच्या लक्ष्यास पाठिंबा देते.

## स्टार्ट अप्स करता दिले जाणार २० कोटींचे अनुदान

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे आज त्याच्या आर्थिक वर्ष २६ च्या परिवर्तन स्टार्ट अप्स ग्रँट्स कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली, हा उपक्रम समाजावर सकारात्मक परिणाम करणाऱ्या नाविन्यांना सहकार्य करत असतो. गेल्या काही वर्षांपासूनच्या उपक्रमांकडून अनुभव प्राप्त केल्यानंतर आता हा उपक्रम आता १० प्राधान्यक्रम असलेल्या क्षेत्रांना सहकार्य करणार असून यांत पर्यावरणातील नाविन्य, कृषी आणि शाश्वत जीवनव्यापन, उत्पादन आणि एमएसएमईतील नाविन्य, वित्तीय समावेशन, लैंगिक वैविध्य आणि समावेशकन तसेच नवीन अशा एआय आणि डीप टेक्नॉलॉजी इत्यादींचा समावेश आहे. आर्थिक वर्ष २६ मध्ये एचडीएफसी बँक परिवर्तन तर्फे २० कोटी रुपयांचे

HDFC BANK | PARIVARTAN

नॉन डायल्युटिव्ह ग्रँट्स देण्यात येणार असून यामुळे साधारणपणे पायलट्स, वैधता आणि अर्ली स्टेज स्केल अप ला मदत होऊ शकेल.

आर्थिक वर्ष २६ च्या या पर्वा मध्ये आणखी एक विशेष घटना असून १० वर्षे पूर्ण होत असतांना ही भागीदारी आता विविध क्षेत्रातील प्रतिथयश संस्थांच्या इन्क्युबेटर्स बरोबरही करण्यात येणार आहे. परिवर्तन स्टार्ट अप ग्रँट्स प्रोग्राम हा उपक्रम इन्क्युबेटरवर आधारीत, पोर्टफोलिओ वर आधारीत मॉडेल नुसार काम करत असून या अंतर्गत भागीदार इन्क्युबेटर्स प्रोग्रामचे डिझाईन, स्टार्टप ची पोहोच, मुल्यांकन, मार्गदर्शन, देखरेख आणि परिणामाचे रिपोर्टिंग वर लक्ष केंद्रित करतो. आर्थिक वर्ष २६ वरील प्रमुख लक्ष देण्यात येणारी केंद्रे

आधीच्या पर्वातील अनुभवाच्या आधारे आर्थिक वर्ष २६ मध्ये हा कार्यक्रम खालील उपक्रमांवर लक्ष केंद्रित करणार आहे- क्षेत्रानुरुप अगदी सखोल दृष्टिकोन ठेऊन आयआयटी मद्रास कडून डीप टेक, आयआयएससी बंगलोर-एफएसआयडी आणि एसआयएनई मुंबई, आयआयएम बंगलोर सह एनएसआरसीईएल आणि आयआयएम लखनऊ कडून आर्थिक सर्वसमावेशन, टी वर्क्स सह मॅन्युफॅक्चरींग ॲक्सलरेटर, बिट्स पिलानी सह पर्यावरणातील नाविन्य आणि विलाग्रो इन्नोव्हेशन फाऊन्डेशन कडून कचरा व्यवस्थापन स्टार्ट अपच्या अर्थ पुरवठ्या व्यतिरिक्त, स्थानिक इकोसिस्टमचा विकास करणारे उपक्रम हे पंजाब राज्यात इंडियन स्कूल ऑफ बिझनेस च्या सहकार्याने (आयएसबी) सह स्टार्ट अप पंजाब च्या आय व्हेंचर बरोबरच्या भागीदारीतून सुरु करण्यात येणार आहे.

## विबग्योर राईज वाघोली शाळेचे यश

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये वाघोली येथील सीबीएसई शाळा 'विबग्योर राईज, च्या विद्यार्थ्यांनी 'ने घवघवीत यश संपादन केले आहे. शाळेच्या इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. बुद्धिबळ स्पर्धेत जयादित्यने जिल्ह्यातील 'टॉप २०' खेळाडूंमध्ये स्थान मिळवले, तर कराटे चॅम्पियनशिपमध्ये निहितने रौप्य व कांस्य पदक आणि ऋषवने सुवर्ण पदक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. शाळेच्या या यशाबद्दल बोलताना प्राचार्य सुश्री विनीता सती म्हणाल्या, "आमची शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या हितासाठी तयार करण्यात आली असून, भक्कम शैक्षणिक पाया आणि अनुभवात्मक शिक्षणाच्या जोरावर आम्ही विद्यार्थ्यांमध्ये उत्कृष्टतेची भावना जोपासत आहोत." तसेच, विबग्योर हायच्या उपाध्यक्षा सुश्री




कविता केरावाला यांनी संस्थेचा व्यापक दृष्टिकोन मांडताना सांगितले की, "जबाबदारी, नावीन्य आणि सहानुभूतीवर आधारित वातावरण निर्माण करून, उद्याचे आदर्श नागरिक घडवणे हे आमचे उद्दिष्ट आहे." क्रीडा क्षेत्रातील यशासोबतच 'विबग्योर मून' आणि विद्यार्थी विनिमय कार्यक्रमांमार्फत ही संस्था विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि जागतिक जाणीवा विकसित करून त्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करत आहे.

# मराठी ZEE5च्या वतीने ओरिजनल सिरीज देवखेळचा ट्रेलर प्रसिद्ध

### पौराणिक कथा, गुन्हा आणि न्यायची सरमिसळ

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मराठी ZEE5 ने आज त्याच्या आगामी मराठी ओरिजनल सिरीज Devkhel (देवखेळ)चा ट्रेलर प्रदर्शित केला. कोकणातील फारशा ऐकिवात नसलेल्या लोककथांपासून प्रेरित, देवखेळ हा एक गहन मानसशास्त्रीय थरारपट आहे. जो शिमगा (होळी) सणाच्या भीतीदायक पार्श्वभूमीवर परंपरा, अंधश्रद्धा आणि गुन्हेगारी यांची सरमिसळ करतो. ही सिरीज दिनांक 30 जानेवारीपासून खास ZEE5 वर स्ट्रीम होणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील देवताली किनारपट्टीवरील गावावर आधारित, देवखेळ एका थरारक रहस्यावर आधारित आहे- दरवर्षी होळी पौर्णिमेच्या रात्री, एखाद्याचा मृत्यू होतो. हे मृत्यू न्यायाचे प्रतीक म्हणून स्थानिक पातळीवर पूजल्या जाणाऱ्या शंकासुर या पौराणिक लोककथा व्यक्तिरेखेनेने दिलेल्या दैवी शिक्षेची कृत्ये आहेत, असा गावकऱ्यांचा विश्वास आहे. ट्रेलरमध्ये अशा जगाची झलक दाखवण्यात आली आहे, जिथे श्रद्धा तर्कशक्तीवर मात करते. भीती ही शांततेला अधोरेखित करते आणि सत्य विधीत दडलेले असते. जेव्हा इन्स्पेक्टर विश्वास सरंजामे गावात येतो, तेव्हा तो अंधविश्वासाला स्पष्टीकरण म्हणून स्वीकारण्यास नकार देतो. ही काळजीपूर्वक लपवून केलेली हत्या असल्याचे त्याचे मत असते. त्याचा तपास सुरू करतो. या मालिकेत इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या भूमिकेत




अंकुश चौधरी असून प्राजक्ता माळी, यतीन कार्येकर, अरुण नलावडे, वीणा जामकर आणि मंगेश देसाई यांच्या प्रमुख भूमिका आहेत. दिग्दर्शक चंद्रकांत लता गायकवाड पुढे म्हणाले, "देवखेळचा जन्म शंकासुर लोककथा परंपरेबद्दलच्या आकर्षणातून झाला - एक विश्वास प्रणाली जिथे न्यायाकडे संस्थात्मक नाही तर दैवी म्हणून पाहिले जाते. आघात, श्रद्धा आणि भीती ह्यामुळे मानवी मनाचे रुपांतर मिथकात कसे होऊ शकते, हा शोध ही सिरीज घेते. ही केवळ एक गुन्हेगारी कथा नाही, तर एक भावनिक आणि मानसिक प्रवास आहे. मराठी ZEE5 ने ही कथा प्रामाणिकपणे आणि निर्भयपणे सांगण्यासाठी परिपूर्ण व्यासपीठ उपलब्ध केले. प्रेक्षकांनी ती अनुभवावी यासाठी आम्ही उत्सुक आहोत." इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेची भूमिका साकारणारा अंकुश चौधरी म्हणाला, "देवखेळ हा सिनेमा रहस्यापेक्षा खूप जास्त आहे - तो विश्वास आणि तर्क यांच्यातील संघर्ष आहे. विश्वास सरंजामे हा तर्कशास्त्र, पुरावे आणि कायद्यात खोलवर रुजलेला माणूस आहे. तरीही त्याला जिथे भीती, श्रद्धा आणि शतकानुशतके जुन्या अंधश्रद्धा लोकांच्या निवडी ठरवतात, अशा ठिकाणी काम करण्यास भाग पाडले जाते. 'दैवी' मुद्यावर प्रश्न उपस्थित करण्यास नकार देणाऱ्या व्यवस्थेमुळे भावनिकदृष्ट्या प्रभावित होऊन वस्तुनिष्ठ राहणे. मला अंतर्गत संघर्षाने सर्वात जास्त आकर्षित केले. कोकणातील वातावरण, शंकासुराची पौराणिक कथा आणि मानसिक तणाव या सिरीजला अविश्वसनीयपणे 'हटके' बनवतात. या भूमिकेसाठी संयम, असुरक्षितता आणि तीव्रता समान प्रमाणात आवश्यक होती. मला खरोखर विश्वास आहे की प्रेक्षकांना प्रत्येक भागासह तो संघर्ष जाणवेल." या मालिकेत महत्त्वाची भूमिका साकारणारी प्राजक्ता माळी पुढे म्हणाली, "देवखेळ वेड लावणारा आहे. कारण आपण ज्यावर क्वचितच प्रश्न विचारतो, अशा वास्तवाला प्रतिबिंबित करतो – विश्वास, भीती, शांतता आणि अगदी अपराधीपणा किती खोलवर असतात. मी ज्या गोष्टीने प्रोजेक्टकडे आकर्षित झाले ते म्हणजे त्याची भावनिक सखोलता आणि सांस्कृतिक प्रामाणिकता! कथा अशा जगात उलगडते जिथे विधी, उत्सव आणि भीती एकत्र राहतात. माझी व्यक्तिरेखा त्या नाजूक संतुलनात राहते. तिला पदर आहेत. ती भावनिकदृष्ट्या गुंतागुंतीची आणि परंपरा, न सांगितलेल्या सत्यांच्या वजनाने आकारलेली आहे. हा ट्रेलर केवळ आगामी मानसिक आणि भावनिक प्रवासाचे संकेत देतो. कोकणातील लोककथांमध्ये रुजलेल्या कथानकाचा भाग असणे, तरीही इतके प्रासंगिक आणि आकर्षक असणे हा खरोखरच समृद्ध करणारा अनुभव आहे." पहा Devkhel (देवखेळ), स्ट्रीमिंग खास ZEE5वर दिनांक 30 जानेवारी 2026 पासून!

# वकील संघाच्या अध्यक्षपदी अॅड. संग्राम ढेरे विजयी

## समर्थकांचा फटाक्यांची आतिषबाजी व गुलालाची उधळण करत जल्लोष



**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुका वकील संघाच्या नुकत्याच झालेल्या कार्यकारिणीची वार्षिक निवडणूक मोठ्या उत्साहात पार पडली. या निवडणुकीत अध्यक्षपदाचे उमेदवार अॅड.संग्राम ढेरे यांनी त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचा मोठ्या मताधिक्याने पराभव करत शानदार विजय मिळवला आहे.

या अटीतटीच्या निवडणुकीत अॅड.संग्राम ढेरे यांना ५७ मते मिळाली, तर प्रतिस्पर्धी आणि अॅड.कैलासराव शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखालील पॅनलचे उमेदवार अॅड.राहुल जाधव यांना अवघ्या ३७ मतांवर समाधान मानावे लागले.

अॅड.ढेरे यांनी २० मतांच्या मोठ्या फरकाने विजय संपादन केल्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कर्जत तालुका वकील संघाच्या निवडणुकीत दोन्ही पॅनलमध्ये अत्यंत अटीतटीची व चुरशीची लढत पहावयास मिळाली.

अॅड.संग्राम ढेरे यांच्या पॅनलच्या अॅड.साधना सुपेकर यांनी खजिनदार पदावर तर अॅड.अमरनाथ खरात यांनी ग्रंथालय सचिव पदावर विजय मिळवला.

तर विरोधी पॅनलचे अॅड.दत्तात्रय चव्हाण यांची उपाध्यक्षपदी आणि सचिवपदी अॅड.अविनाश मते हे विजयी झाले आहे. तसेच यापूर्वी अपक्ष म्हणून अॅड.आरती टकले यांची बिनविरोध महिला सचिवपदी निवड झाली होती.

निवडणुकीचा निकाल जाहीर होताच कर्जत न्यायालय परिसरात सर्वच वकील सदस्यांनी एकत्रित येत फटाक्यांची आतिषबाजी करून गुलालाची उधळण करत विजयोत्सव साजरा केला.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष अॅड.संग्राम ढेरे यांचे स्वागत करण्यात आले.

तालुक्यातील ज्येष्ठ वकीलांसह सर्व सदस्यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष ढेरे व त्यांच्या नवीन कार्यकारिणीच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

### वकील संघाच्या हितासाठी सदैव प्रयत्नशील !



कर्जत तालुका वकील संघाचा नावलौकिक वाढवून वकीलांचे विविध प्रश्न व हितासाठी सदैव प्रयत्नशील राहून कर्जत - जामखेड तालुक्यातील जनतेसाठी फायदेशीर ठरणारे फौजदारी जिल्हा न्यायालय कर्जत येथे लवकरात लवकर सुरू होण्यासाठी पाठपुरावा करू. सर्व सदस्यांच्या विविध प्रश्नांवर ही नूतन कार्यकारीणी मोठ्या विश्वासाने व जोमाने न्यायाची भूमिका घेत काम करेल, अशी ग्वाही नवनिर्वाचित अध्यक्ष अॅड.संग्राम ढेरे यांनी यावेळी दिली.

# विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश अभय लाहोटी यांनी केली त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत

**(समर्थ गांवकरी)**



सप्तश्रृंगी गड ट्रस्टच्या वतीने विश्वस्त अॅड. ललित निकम यांनी उपोषणस्थळी जाऊन या निर्णयाचे अधिकृत पत्र उपोषणकर्त्यांना सुपूर्त करण्याचा प्रयत्न केला.

सप्तश्रृंगगड येथील रहिवासी व ग्रामपंचायत सदस्या बेबीबाई जाधव आणि छगन जाधव यांनी मांडलेल्या विविध मागण्यांबाबत विश्वस्त संस्थेच्या वतीने संदर्भीय विषयांवर त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमणे बाबत मंगळवार, (ता. २०) रोजी ट्रस्टचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश अभय लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वस्त मंडळाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत जाधव यांच्या निवेदनातील मागण्या व तक्रारीची सखोल चौकशी करण्यासाठी विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश अभय लाहोटी यांनी एका त्रिसदस्यीय समिती नेमली आहे. या समितीमध्ये कळवणचे तालुका न्यायदंडाधिकारी, तहसीलदार आणि ज्येष्ठ विधिज्ञ चैतन्य ब्राम्हणकर यांचा समावेश करण्यात आला आहे. ही समिती आपला अंतरिम अहवाल ३० दिवसात सादर करणार असून, त्या अहवालानुसार पुढील नियमांतर्गत कारवाई केली जाणार आहे.

ट्रस्टच्या वतीने विश्वस्त अॅड. ललित निकम यांनी उपोषणस्थळी जाऊन या निर्णयाचे अधिकृत पत्र उपोषणकर्त्यांना सुपूर्त करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. परंतु, बेबीबाई जाधव व छगन जाधव यांनी हे पत्र स्वीकारण्यास नकार दिला. दरम्यान, "आम्ही प्रथम तहसीलदारांसोबत सविस्तर चर्चा करू," अशी भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली आहे. त्यानुसार विश्वस्त तथा कळवणचे तहसीलदार वारुळे यांनीही उपोषणकर्त्यांशी चर्चा केली असता, प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिलेला असला तरी उपोषणकर्त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारण्यास असमर्थता दर्शवली आहे.

# ११५७ बांधकाम मजुरांना 'सुरक्षा कवच'

### ९५ लाख रुपयांचा शासकीय निधी वर्ग

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

देशभरातून येणाऱ्या साईभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डीत विकासाची कामे वेगाने सुरू असतानाच, या विकासाचे शिल्पकार असलेल्या बांधकाम मजुरांच्या सुरक्षेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र शासनाचा कामगार विभाग, गोदरेज कंपनी व त्यांच्या सहयोगी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत शिर्डीतील ११५७ बांधकाम कामगारांची अधिकृत नोंदणी पूर्ण करण्यात आली आहे. या कामगारांना सुरक्षा साहित्य व ओळखपत्र प्रदान करण्यात आले असून, त्यांच्या कल्याणासाठी ९५ लाख रुपयांचा शासकीय निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. बांधकाम क्षेत्रात काम करणारे मजूर अनेकदा स्थलांतरित असतात. ओळखपत्रांचा अभाव आणि क्लिष्ट प्रक्रियेमुळे ते शासकीय लाभांपासून वंचित राहतात. ही अडचण ओळखून प्रशासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सामाजिक सुरक्षा' या संकल्पनेवर भर दिला आहे. या उपक्रमांतर्गत मजुरांना केवळ नोंदणीकृतच केले नाही, तर त्यांना बांधकाम कामगार मंडळ ओळखपत्र देऊन अधिकृत दर्जा मिळवून दिला आहे. मजुरांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनाने शिर्डीत विशेष जनजागृती शिबिरे आयोजित केली. यामध्ये कामगारांना प्रत्यक्ष मदत, मार्गदर्शन, समुपदेशन व आरोग्य तपासणी अशा विविध टप्प्यांतून साहाय्य पुरवण्यात आले. कामगारांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देत, त्यांना आरोग्य सुविधा व कामाच्या ठिकाणी सुरक्षितता प्रदान करणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. शासनाच्या या सकारात्मक हस्तक्षेपामुळे शिर्डीतील बांधकाम मजुरांना आता हक्काचे 'सुरक्षा कवच' मिळाले असून, ९५ लाखांच्या निधीतून त्यांच्या भविष्यातील आर्थिक व सामाजिक सुरक्षेचा मार्ग अधिक प्रशस्त झाला आहे.

# ठिकठिकाणी गळती

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कुकडी प्रकल्पातील पिंपळगाव जोगा धरणावर असलेल्या डाव्या कालव्यामधून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत आहे . कालव्याच्या कडेला असलेल्या जमिनीमध्ये पाणी साचत असल्याने त्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे . त्यामुळे कालव्याचे लवकरच लवकर दुरुस्ती करण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे . जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा धरणावर असलेला कुकडी डावा कालवा हा पुणे व अहिल्यानगर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणारा महत्त्वाचा कालवा आहे. या कालव्याला जवळपास १५ ते १६ वर्षे पासून ठीक ठिकाणी भेगा पडल्या आहेत .त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत आहे .

# वंचित बहुजन आघाडीची महत्त्वपुर्ण बैठक संपन्न

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



कंधार येथे आगामी जि.प. व पं.स. निवडणुकी संदर्भात वंचित बहुजन आघाडीचे दक्षिण जिल्हाध्यक्ष मा.शंकरराव महाजन,जिल्हा महासचिव रवि पंडित यांच्या प्रमुख उपस्थीती मध्ये २१ रोजी कंधार येथील शासकीय विश्रामगृह येथे महत्त्वपुर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीच्या सर्व विंग च्या आजी माजी कार्येकर्ते,पदाधीकारी,समन्वयकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला जिल्ह्याचे जिल्हा उपाध्यक्ष गणपत सवईसोनकांबळे उपाध्यक्ष अरुण भद्रे,सचिव रघुनाथ गजले, संघटक संजय टिके, सल्लागार डॉ.रामचंद्र वंनजे, सल्लागार भगवानराव हनुमंते, कायदे सल्लागार अॅड जयपाल ढवळे, प्रसिद्धी प्रमुख नामदेव पांचाळ, सुरेश गजभारे यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हाध्यक्ष शंकर महाजन यांनी कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन करताना श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकरांनी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला जिल्हाध्यक्ष बनवले. सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन आपल्याला जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका लढवायच्या असून ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे. कार्यकर्त्यांनी जोमाने कामला लागण्याचे आदेश दिले.तसेच संघटनात्मक बांधणी करण्यासाठी कार्यकर्त्याची चाचपणी केली. लवकरात लवकर तालुका बॉडी जाहीर केली जाईल असे आश्वासन दिले. श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर शोषित वंचित घटकांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्याचेच उदाहरण म्हणून गेल्या नगरपालिका व महानगरपालिकेमध्ये आपले नगरसेवक मोठ्या प्रमाणात निवडून आले असल्याचे कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीला उपस्थित वंचित बहुजन आघाडीचे माजी ता.अध्यक्ष संतोष पाटील गवारे,भारतीय बौद्ध महासभाचे ता.अध्यक्ष जितेंद्र ढवळे,माजी ता. उपाध्यक्ष राणा प्रताप पवळे, माजी.ता.संघटक रणजीत कसबे, माजी.ता.सचिव मनोहर सूर्यवंशी, माजी.ता.प्रसिद्धी प्रमुख भास्कर कदम, माजी ता.उपाध्यक्ष माधव पुनवाड, प्रल्हाद गायकवाड, दिलीप जोंधळे, समता सैनिक दलाचे मेजर संतोष दुंडे,अविनाश कांबळे,मोसिन बागवान, अहेमद पठाण, सुरेश शिरसे सर,राजेश्वर कांबळे, सिद्धार्थ वाघमारे, संभाजी कांबळे, सूर्यकांत वाघमारे, महासचिव रुपेश कांबळे,प्रदीप सोनकांबळे, धोंडीबा सोनकांबळे, राहुल कदम, अन्य कार्यकर्ते आजी माझी सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळा कालवारच्या विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम

■ "खाऊचे पैसे सैनिकांच्या कुटुंबासाठी" – चिमुकल्यांकडून राष्ट्रप्रेमाचा आदर्श

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




भिवंडी तालुक्यातील केंद्र राहनाळ अंतर्गत जिल्हा परिषद शाळा कालवार येथील विद्यार्थ्यांनी "खाऊचे पैसे सैनिकांच्या कुटुंबासाठी" हा आगळा-वेगळा व प्रेरणादायी उपक्रम राबवून समाजासमोर राष्ट्रप्रेमाचे जिवंत उदाहरण सादर केले आहे. देशसेवेसाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या भारतीय जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम शाळेतील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे राबविला.

या उपक्रमांतर्गत गोळा झालेली रक्कम रुपये ११,१७०/- ही दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजी ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या कार्यालयामार्फत सैनिक कल्याण निधी कार्यालयात जमा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण, देशप्रेमाने ओतप्रोत उपक्रमाचे जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले. शाळेच्या परिपाठादरम्यान शिक्षक प्रशांत भोसले यांनी ही संकल्पना मांडली असता, सर्व शिक्षकवृंदाने तिचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना भारतीय जवानांचे जीवन, त्यांचे त्याग, सीमेवरील हालअपेष्टा व कठीण प्रसंग यांची माहिती चित्रफीत व कथनाच्या माध्यमातून देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात सैनिकांप्रती आदर व आपुलकीची भावना निर्माण झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका अनिला काबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेमध्ये मूल्यशिक्षणावर आधारित विविध उपक्रम सातत्याने राबविले जात असून, शाळा व्यवस्थापन समिती कालवार यांचाही या उपक्रमात सक्रिय सहभाग राहिला. "आपण रोज आवडीचे पदार्थ खातो, मात्र आपले सैनिक अनेकदा अर्धपोटी राहून सीमेचे रक्षण करतात" ही जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजताच, त्यांनी आपला खाऊचा पैसा गल्ल्यात जमा करण्यास सुरुवात केली.

विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाची माहिती पालकांना मिळताच, त्यांनीही स्वतः शाळेत येऊन शक्य तितकी आर्थिक मदत गल्ल्यात जमा केली. त्यामुळे उपक्रमाला अधिक बळ मिळाले. तसेच गावकऱ्यांकडूनही या उपक्रमास भरभरून शुभेच्छा मिळाल्या.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या काळात शासनाच्या सूचनेनुसार शिक्षणाचा प्रसार व प्रचार व्हावा या उद्देशाने इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये जाऊन गवळण व साक्षरता गीतांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या या विशेष धडपडीने प्रभावित होऊन ग्रामस्थांनी आरतीच्या ताटात मोठ्या प्रमाणावर शुभेच्छारूपी दान दिले.



# परमेश्वर थोटे यांचे निधन

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

जांब (बु) येथील माजी पंचायत समिती सदस्य परमेश्वर लालूजी थोटे यांचं वयाच्या 70 व्या वर्षी दीर्घ आजाराने दि. 22 रोजी उपचार दरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जांब बु येथील स्मशानभूमी येथे दि.22 जानेवारी रोजी संध्याकाळी 6 वाजता अंत्यविधी करण्यात आली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सहशिक्षक आकाश थोटे व मेजर विठ्ठल थोटे यांचे ते काका होत. त्यांच्या अंत्यविधीला राजकीय,सामाजिक क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती होती.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळालाही तितकेच महत्त्व द्यावे – रणजित यादव

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**




विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत केंद्र, तालुका व जिल्हा पातळीवर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. त्याच अनुषंगाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी ऑल सेट्स हायस्कूल, भवाळे, तालुका भिवंडी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धांचे उद्‌घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेची सुरुवात क्रीडा मशाल प्रज्वलन करून तसेच पाच तालुक्यांतील विद्यार्थी प्रतिनिधींनी मानवंदना देऊन करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासासोबतच मैदानी खेळांना तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात. निरोगी व सुदृढ आयुष्यासाठी दररोज खेळाची सवय लागणे गरजेचे आहे.

तसेच ठाणे जिल्ह्यात विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी सुरू असलेल्या 'दिशा' उपक्रमाच्या पुढील टप्पा म्हणून 'मिशन भरारी' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत असल्याची घोषणा त्यांनी केली.

# नवनियुक्त CRPF जवान गणेश चंचलवाड यांचा भव्य सत्कार

**भोकर : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील धानोरा येथील नवनियुक्त केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) जवान गणेश माधव चंचलवाड यांचा भव्य सत्कार सोहळा दि. १८ जानेवारी २०२६, रविवार रोजी रात्री धानोरा येथे मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम ओबीसी नेते तथा यशवंत सेनेचे मराठवाडा प्रमुख नागोराव शेंडगे बापू यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमास श्रीनिवास पाटील लामगे, सुभाष मुळेकर, दत्ता पा. शेंडगे, साईनाथ हामंद, सुभाष खांडरे, दिगांबर गोरापूडे महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, गरिबीवर मात करत गणेश चंचलवाड यांनी जिद्द, चिकाटी व अथक परिश्रमाच्या जोरावर शिक्षण पूर्ण केले. महावितरण (एम.एस.ई.बी.) मध्ये नोकरी लागल्यानंतरही देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी केंद्रीय पोलीस दलात प्रवेश मिळवला. त्यांच्या या यशाबद्दल धानोरा ग्रामस्थांच्या वतीने हा सत्कार आयोजित करण्यात आला. या प्रसंगी फटाक्यांची आतषबाजी, गुलाल उधळत गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. जवान चंचलवाड यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस नागोराव शेंडगे बापू तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी मोहन नव्हाते यांनी मार्गदर्शन केले.

# नवउद्योजक कार्यशाळेचे समाजसेवक अनंत घाणे यांच्या हस्ते उद्‌घाटन

### पर्यटन आधारित व्यवसायांना चालना देण्याचा निर्धार!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




स्वप्नपूर्ती फाउंडेशन यांच्या वतीने घाटघर इको सिटी येथे आयोजित करण्यात आलेल्या नवउद्योजक कार्यशाळेचे उद्‌घाटन समाजसेवक अनंत महादू घाणे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

अकोले तालुक्यातील कळसुबाई–हरिश्चंद्रगड वन्यजीव अभयारण्य हा परिसर पर्यटकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरत असून, साम्रद येथील सांदण व्हॅली, कळसुबाई शिखर, हरिश्चंद्रगड, रतनगड, अमृतेश्वर, वीर राघोजी भांगरे जलाशय, रंधा धबधबा, कोकणकडा अशा निसर्गसौंदर्याने नटलेल्या स्थळांमुळे हा भाग पर्यटकांना भुरळ घालत आहे. या पर्यटनामुळे स्थानिक पातळीवर व्यवसायांना चालना मिळावी, या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या उद्‌घाटनप्रसंगी समाजसेवक अनंत महादू घाणे, स्वप्नपूर्ती सामाजिक संस्थाचे संस्थापक अध्यक्ष सचिन काकडे, सामाजिक कार्यकर्ते बाजीराव सगभोर, देविदास खडके, सुनील पवार, उपसरपंच काळु बांडे, किसन वाघमोडे, रमेश खडके, कृष्णा सोडणर, राहुल बांडे, प्रशिक्षक प्रभाकर काकडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच घाटघर, साम्रद, शिंगणवाडी, उडदावणे परिसरातील प्रशिक्षणार्थी लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात संस्थापक अध्यक्ष सचिन काकडे, देविदास खडके, सोमनाथ गभाले, काशिनाथ खोले, बाजीराव सगभोर, उपसरपंच काळु बांडे, कृष्णा सोडणर आणि प्रशिक्षक प्रभाकर काकडे यांनी मनोगत व्यक्त करत नवउद्योजक प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. या दोन दिवसीय कार्यशाळेत केंद्र व राज्य शासनाच्या विविध उद्योग व रोजगार योजनांची सविस्तर माहिती प्रशिक्षणार्थींना देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी समाजसेवक अनंत महादू घाणे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत व्यवसायाच्या संधी आणि शासनाच्या योजना पोहोचवणे हाच आमचा उद्देश आहे. या भागात होत असलेली ही तिसरी कार्यशाळा असून, त्याचा लाभ जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांना व्हावा."

अकोले तालुका हा कळसुबाई–हरिश्चंद्रगड वन्यजीव अभयारण्यमुळे पर्यटकांच्या दृष्टीने "जम्मू-काश्मीर" सारखा निसर्गसंपन्न मानला जातो. येथे येणाऱ्या पर्यटकांना आवश्यक सेवा-सुविधा देण्यासाठी स्थानिक तरुणांनी पुढे येऊन पर्यटनाधारित विविध व्यवसाय उभारावेत, असे आवाहन त्यांनी केले.

स्वप्नपूर्ती फाउंडेशन ही संस्था समाजातील दुर्बल घटकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सातत्याने कार्यरत असल्याचे सांगून, नवउद्योजकांनी प्रशिक्षणात सक्रिय सहभाग घ्यावा, बँक व शासकीय योजनांच्या माध्यमातून भांडवल उभारणी करून स्वतःचा व्यवसाय उभारावा असे मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच बचतगटातील महिला, नवतरुण-नवतरुणींनी या संधीचा लाभ घ्यावा, कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीसह पुढील पिढीसाठी शिक्षण व विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन ठेवून उज्ज्वल भविष्य घडवावे, असा संदेश या कार्यशाळेत देण्यात आला.

# बाल आनंद मेळाव्यात हजारोंची उलाढाल

## विद्यार्थ्यांनी लावले खाद्यपदार्थसह विविध १३० स्टॉल्स

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

शालेय विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहार ज्ञानही आत्मसात करता आले पाहिजे, विद्यार्थ्यांना गणिती क्रिया आत्मसात व्हाव्यात तसेच त्यातून तो भविष्यकाळात सक्षम नागरिक बनला पाहिजे या उद्देशाने शहरातील एकलव्य शिक्षण संस्थेचे एम. एम. नि-हाळी विद्यालयात बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे विद्यार्थी विद्यार्थिनींनी खूप चविष्ट व चटकदार तसेच आरोग्यदायी खाद्यपदार्थ बनवून आणले होते. मेळाव्याचा विद्यार्थी सह पालकांनी आनंद घेतला.

स्टॉल धारक विद्यार्थ्यांनी स्टॉलची मांडणी, विविध पदार्थाची केलेली खरेदी विक्री गणिती क्रिया प्रत्यक्षात अमलात आणल्याचे पाहून पालकचकीत झाले, आम्ही केलेल्या पदार्थाची चव घ्या. म्हणून विद्यार्थी आग्रह करत होते.



मान्यवरांनी पदार्थ चांगला झाला असे सांगितले की, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद स्पष्ट दिसत होता. बुधवारी येथील आठवडे बाजार असूनही त्यापूर्वीच येथील बाजारात हिरव्यापालभाज्या , भेळ, खेळणी, पाणीपुरी, वडापाव, तसेच विविध खाद्यपदार्थ सोबत पेरू, चिकु, बोरे, संत्री, आसाराम मेवा विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी आणला होता. इयत्ता पहिली ते दहावी विद्यार्थ्यांनी स्टॉल लावलेले होते. विद्यार्थ्यांनी सेफ ची वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा धारण केली होती. विद्यार्थ्यांनी हजारो रुपयाची उलाढाल केली.

मेळाव्याचे उद्घाटन एकलव्य शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष कांतीलाल गुगळे, माजी जिल्हा परिषद सदस्या प्रभावती ढाकणे, शिक्षण विस्ताराधिकारी रामनाथ कराड, विश्वस्त श्रीकांत नि-हाळी, समन्वयक बाळकृष्ण जोशी, नगरसेवक देवा पवार, नगरसेविका सविता भापकर, सुरेखा हंडाळ, माणिकराव पालवे, संजय दहिफळे, विद्यालयाचे प्राचार्य संजय घिगे आदी मान्यवर उपस्थित होते.




ठाणे : दिव्यात न्यू लक्की स्टार मोटर ड्रायविंग स्कुलचे शिवसेना उपशहर प्रमुख तथा नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्याहस्ते उदघाट्न करण्यात आले. दिवा शहरातील सिद्धिविनायक गेट समोरील एकविरा गॅलॅक्सी मधील शॉप क्र १४ मध्ये स्कुलचे शिवाजी खोत यांची ही शाखा क्र. २ सुरु करण्यात आली आहे. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### श्रीगोंद्यात विषय समिती सभापतींची निवड; भाजपचे समित्यांवर वर्चस्व

श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा नगरपालिकेच्या विविध विषय समित्यांच्या सभापती निवडीसाठी सोमवारी विशेष सभा पार पडली. निवडणूक अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत यांच्या उपस्थितीत ही सभा झाली. या निवड प्रक्रियेत भारतीय जनता पक्षाने विविध समित्यांवर वर्चस्व राखले असून शिवसेनेला शिक्षण समितीची जबाबदारी देण्यात आली आहे. शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समितीच्या सभापतीपदी सुशीलकुमार शिंदे यांची, तर उपसभापतीपदी दिपाली बोरुडे यांची निवड करण्यात आली. या निवडीनंतर माजी मंत्री बबनराव पाचपुते, आमदार विक्रम पाचपुते आणि नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी सतीश बोरा, पोपटराव खेतमाळीस, राजेंद्र उकांडे, उमेश बोरुडे यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. दरम्यान, सभापती निवडीच्या पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित उपनगराध्यक्षा अलका सुनील अनभुले यांनी सोमवारी आपल्या पदाचा अधिकृत पदभार स्वीकारला. माजी मंत्री बबनराव पाचपुते व नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पदभार स्वीकारण्यात आला. शहराच्या शाश्वत विकासासाठी स्वच्छता व आरोग्य या विषयांना प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



### जनता कन्या विद्यालय, काष्टी येथे रस्ता सुरक्षा नियमांवर चर्चासत्र

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : जनता कन्या विद्यालय, काष्टी येथे विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा नियमांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर परिवहन विभागाच्या वतीने विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. "रस्त्याचा वापर करताना पाळायचे नियम" या विषयावर आधारित या कार्यक्रमास मुख्याध्यापिका जोगदंड मॅडम यांनी अध्यक्षस्थान भूषवले. त्यांनी प्रास्ताविकात पाहुण्यांची ओळख करून देत शाळेविषयी माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी अहिल्यानगर येथील परिवहन कार्यालयातील सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री. हर्षल रामभाऊ जगताप आणि प्रियंका प्रकाश चोथे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना रस्ता व वाहतूक नियमांची सविस्तर माहिती दिली. १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय तसेच वैध वाहनचालक परवाना (लायसन्स) नसताना वाहन चालवू नये, नियमांचे उल्लंघन केल्यास होणारी कायदेशीर कारवाई याबाबत त्यांनी स्पष्ट मार्गदर्शन केले. या चर्चासत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये रस्ते व वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शिंदे सर यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दिव्यातील नगरसेवक दीपक जाधव ठाणे महापौर व्हावे ही दिवेकरांची इच्छा



ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महापौर पदासाठी यंदा अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण जाहीर झाले असून प्रभागातून निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी एकाच्या गळ्यात महापौर पदाची माळ पडणार असून या पदासाठी आता राजकीय हालचालींना वेग आला आहे. यामध्ये अनुसूचित जातीसाठी आरक्षित असलेल्या सात जागा शिंदे सेनेने लढवल्या होत्या तर दोन जागा भाजपने लढवल्या होत्या. पालिकेत शिंदे सेनेने ७५ नगरसेवक निवडून आणत बहुमताचा आकडा पार केला असून त्यांचा महापौर होणार असल्याचे बोलले जात आहे. शिंदेच्या शिवसेनेकडून अनुसूचित जाती प्रवर्गातून प्रभाग ३ (अ) महिला – पद्मा भगत, ६ (अ) महिला वनिता घोगरे, ७ (अ) महिला विमल भोईर (अ) – गणेश कांबळे, १६ (अ) डॉ. दर्शना जानकर, २४ (अ) महिला आरती गायकवाड आणि २८ (अ) दीपक जाधव यांचा समावेश असून महापौर पदासाठी शिंदे सेनेतून कोणाचे नाव पुढे येणार याकडे लक्ष लागले आहे. ठाणे मनपा महापौर पद आरक्षित झाल्यानंतर काही मोजक्यात नावांमध्ये दिवा प्रभाग समितीतील प्रभाग क्र.२८ मधून दुस-यांदा निवडुन आलेले दिपक जाधव यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. दिपक जाधव हे माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांचे निकटवर्तीय मानले जातात. दिवा-शीळ विभागातून शिवसेनेचे १० नगसेवक एकतर्फी निवडुन आले आहेत त्यामुळे शिवसेना या विभागातून भक्कमपणे उभी उभी असलेली पाहवयास मिळत आहे. दरम्यान अनुभवी नगरसेवक दिपक जाधव यांची ठाणे महापौरपदी निवड झाल्यास दिवा शहरातील विकासाला गती मिळेल.

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात फूड फेस्टिवल उत्साहात संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात "एक प्रेरणा स्वयंरोजगाराच्या दिशेने" हे घोषवाक्य केंद्रस्थानी ठेवून फूड फेस्टिवलचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमास सौ. वैजयंताताई बाबासाहेब भोस व सौ. कुसुमताई प्रकाशशेठ पटवा प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

उद्घाटक सौ. वैजयंताताई भोस यांनी विद्यार्थ्यांनी फूड फेस्टिवलमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या उपक्रमातून प्रेरणा घेऊन भविष्यात उद्योजक व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या सौ. कुसुमताई पटवा म्हणाल्या की, युवकांनी मार्केटिंगमध्ये स्वतःचे स्थान निर्माण करून यशस्वी उद्योजक बनावे. फूड फेस्टिवलसारखे उपक्रम व्यक्तिमत्त्व



विकासासाठी प्रेरणादायी ठरतात. कर्मवीरांच्या स्वावलंबी शिक्षणाचा मंत्र अशा उपक्रमांतून प्रत्यक्षात उतरतो, असेही त्यांनी नमूद केले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी केले. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांगीण विकसित व्हावे, या उद्देशानेच फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

फूड फेस्टिवलचे समन्वयक व वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रावसाहेब काळे यांनी प्रस्तावना करताना सांगितले की, उद्योजक जन्माला येत नाहीत, तर त्यांना घडवावे लागते. त्यासाठीच हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

या फूड फेस्टिवलचा आस्वाद घेण्यासाठी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मा. बाबासाहेब भोस यांची उपस्थिती प्राध्यापक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढवणारी ठरली. या उपक्रमात महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनुराधा ताटे व प्रा. शेखर हिवाळे यांनी केले. या समारंभास उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे, डॉ. नितीन थोरात, डॉ. सुदाम भुजबळ, कार्याध्यक्ष प्रा. पंकज कदम, श्री. रघुनाथ लोखंडे, अधीक्षक बाळासाहेब राऊत, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, डॉ. राजाराम कानडे, डॉ. राहुल गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी प्रा. भाऊसाहेब बुलाखे, प्रा. देवेंद्र बहिरम, डॉ. किरण ढवळे यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यस्तरीय नृत्यमल्हार स्पर्धेत उल्लेखनीय यश

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

अण्णाभाऊ साठे रंगमंदिर, येरवडा, पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या नृत्यमल्हार या राज्यस्तरीय शास्त्रीय कथ्यकनृत्य प्रकारात श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री तिलोक जैन विद्यालयातील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सादरीकरण करत शाळेचे नाव उज्ज्वल केले. ग्रामीण भागातून शास्त्रीय नृत्याचे धडे गिरवून व सदर प्रकार आत्मसात करून त्याचे राज्याच्या व्यासपीठावर सादरीकरण करणे ही बाब अत्यंत गौरवास्पद आहे. या स्पर्धेत अमृता अरुण पानसंबळ, श्रावणी गोरक्ष जायभाये,तेजम रामेश्वर लोटके, अक्षदा सुरेश पवार, ऋतुजा संतोष पवार, रेणुका भगवंत कदम, ईश्वरी सचिन मरकड, राधिका देविदास कोकाटे, पल्लवी संजय चव्हाण, अथश्री संतोष घोगरे, कायरा संदिप चव्हाण या विद्यार्थिनींनी कथ्थक नृत्याच्या सादरीकरणातून कलात्मकता, लयबद्धता व भावपूर्ण अभिनय सादर करत परीक्षक व प्रेक्षकांची भरभरून दाद मिळवली. ग्रामीण भागामध्ये शास्त्रीय नृत्य हा प्रकार जवळपास अस्तित्वात नसताना अशा प्रकारची कला शिकणे व राज्यस्तरावर त्याचे सादरीकरण करणे ही बाब संस्थेच्या दृष्टीने अतिशय अभिमानास्पद असल्याची भावना संस्थेचे सचिव सतीश गुगळे यांनी व्यक्त केली. या यशाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष चंपालाल गांधी, सचिव सतिश गुगळे, कोषाध्यक्ष सुरेश कुचेरिया, विश्वस्त डॉ. ललित गुगळे, राजेंद्र मुथ्था, धरमचंद गुगळे या सह कार्यकारी व सल्लागार मंडळाचे सदस्य यांनी विद्यार्थिनींचे विशेष कौतुक केले.

## ७७ वा प्रजासत्ताक दिन सोहळा साकेत पोलीस मैदानावर



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ सोमवार, दि.२६ जानेवारी २०२६ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते साकेत पोलीस मैदान येथे सकाळी ९.१५ वा.संपन्न होणार आहे. ध्वजारोहणाच्या वेळी राष्ट्रीय/ समारंभीय पोषाख परिधान करण्यात यावा. ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८-३० ते १० वाजेदरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वतःचा ध्वजारोहणाचा समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८-३० पूर्वी किंवा सकाळी १० वाजेनंतर करावा. ध्वजसंहितेतील सर्व नियमांचे व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. कागदी राष्ट्रध्वजाचा वापर ध्वजसंहितेच्या तरतूदीमध्ये नमूद केल्यानुसारच करावा. ख़राब झालेले माती लागलेले राष्ट्रध्वज गोणी किंवा कपड्यामध्ये व्यवस्थित बांधून शिवून बंद करावेत.

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत केंद्र, तालुका व जिल्हा पातळीवर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. त्याच अनुषंगाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी ऑल सेट्स हायस्कूल, भवाळे, तालुका भिवंडी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धांचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेची सुरुवात क्रीडा मशाल प्रज्वलन करून तसेच पाच तालुक्यांतील विद्यार्थी प्रतिनिधींनी मानवंदना देऊन करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासासोबतच मैदानी खेळांना तितकेच महत्त्व




देणे आवश्यक आहे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात. निरोगी व सुदृढ आयुष्यासाठी दररोज खेळाची सवय लागणे गरजेचे आहे. तसेच ठाणे जिल्ह्यात विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी सुरू असलेल्या 'दिशा' उपक्रमाच्या पुढील टप्पा म्हणून 'मिशन भरारी' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत असल्याची घोषणा त्यांनी केली. या उपक्रमांतर्गत गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना देशातील नामांकित संशोधन संस्था व शैक्षणिक केंद्रांना भेटी देण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. प्रास्ताविकात शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळाचे महत्त्व विशद केले. तसेच जिल्हा परिषदेमार्फत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

कार्यक्रमास गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती भिवंडी संजय अस्वले, गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती शहापूर हिराजी वेखंडे, विस्तार अधिकारी शिक्षण, केंद्रप्रमुख, मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक तसेच प्राथमिक शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. स्पर्धांच्या यशस्वी आयोजनाची जबाबदारी विस्तार अधिकारी शिक्षण आशिष झुंजारराव यांनी समर्थपणे पार पाडली.

# सांगलीत निरंकारी संत समागमाचा शुभारंभ २४ जानेवारी पासून!

## एकत्वभाव, शिस्त व सेवाभावातून व्यापक तयारी अंतिम टप्प्यात!

**सांगली : (समर्थ गांवकरी)**

प्रेम, सेवा आणि एकत्वाच्या पावन भावनांनी ओतप्रोत असलेला महाराष्ट्रातील ५९वा निरंकारी संत समागम येत्या २४ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत सांगली येथे श्रद्धा, शिस्त आणि भव्यतेने संपन्न होणार आहे. हा दिव्य समागम संत निरंकारी मिशन यांच्या वतीने परमपूज्य माता सुदीक्षाजी महाराज तसेच निरंकारी राजपिता रमितजी यांच्या दिव्य सान्निध्यात आयोजित करण्यात आला आहे.

सांगली शहरालगत सांगलवाडी परिसरातील सुमारे ४०० एकरांच्या विस्तीर्ण मैदानावर या संत समागमाचे आयोजन करण्यात आले असून, तीन दिवस चालणाऱ्या या आध्यात्मिक सोहळ्याची तयारी सध्या अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. गेल्या एक महिन्यापासून महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतून आलेले हजारो निरंकारी सेवादार निष्काम सेवाभाव, शिस्त आणि समर्पणातून समागमस्थळ सुसज्ज करत आहेत.

या संत समागमांतर्गत दररोज दुपारी २.३० वाजता मुख्य सत्संगास प्रारंभ होणार आहे. देश-विदेशातून येणारे संत, वक्ते, गीतकार व कवी आपल्या विचार, गीत आणि रचनांद्वारे ईश्वर-परमात्मा व सद्गुरूप्रती श्रद्धाभाव व्यक्त करणार आहेत. प्रत्येक दिवसाचा समारोप रात्री ९ वाजता माता सुदीक्षाजी महाराजांच्या प्रेरणादायी आशीर्वचनांनी होणार असून, ती सर्व भाविकांसाठी आध्यात्मिक मार्गदर्शनाचा आधार ठरेल.

यंदाच्या महाराष्ट्र प्रादेशिक संत समागमासाठी 'आत्म-मंथन' ही संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. आत्मबोध, आत्मशुद्धी आणि मानवी मूल्यांच्या जागृतीसाठी ही संकल्पना संपूर्ण समागमाला अर्थपूर्ण व गहन आध्यात्मिक अधिष्ठान देणार आहे.




लाखो भाविकांच्या सोयीसाठी निवासी तंबू, भव्य लंगर (सामूहिक भोजन), कॅन्टीन, औषधालय, सुरक्षा व्यवस्था, नियोजित वाहनतळ तसेच रेल्वे व बस स्थानकांहून ये-जा करण्यासाठी विशेष वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. स्वच्छता व सुव्यवस्थेला विशेष प्राधान्य देण्यात आले असून, संपूर्ण परिसर नियोजनबद्ध पद्धतीने सजविण्यात आला आहे.

समागमस्थळी निरंकारी प्रकाशन विभागामार्फत आध्यात्मिक साहित्याचे स्टॉल, संत निरंकारी मिशनचा इतिहास व मानवी सेवाकार्ये दर्शविणारी चित्रमय निरंकारी प्रदर्शनी, तसेच बालकांसाठी विशेष बाल प्रदर्शनी व सर्जनशील-शैक्षणिक कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. हे उपक्रम बालमनाच्या सर्वांगीण विकासाला पूरक ठरणार आहेत.

मानवकल्याण आणि आध्यात्मिक उन्नतीच्या उद्देशाने आयोजित या मानवतेच्या महासंगमात सहभागी होण्यासाठी जनसामान्यांना खुले सत्संग, पथनाट्ये व बॅनर्सद्वारे आमंत्रित करण्यात येत आहे. अधिकाधिक श्रद्धाळू व सज्जन नागरिकांनी या आध्यात्मिक उत्सवात सहभागी होऊन निरंकार ईश्वराच्या आश्रयाने आपले जीवन अधिक सार्थक करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीत सेना, भाजप युतीचा फटका

## कार्यकर्ते संभ्रमात...!

(समर्थ गांवकरी)

वैजापुर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत शिवसेना,भाजप युतीमुळे स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांची मोठी पंचाईत झाल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते एकमेकांविरुद्ध लढत आलेले असताना,अचानक झालेल्या युतीमुळे नेमके कोणासाठी काम करायचे,कोणाचा प्रचार करायचा, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

वर्षानुवर्षे पक्ष वाढीसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांना उमेदवारी वाटपात डावलले गेले असल्याची भावना आहे. काही ठिकाणी नाराजी,तर काही

## जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीत सेना,भाजप युतीमुळे कार्यकर्त्यांची पंचाईत...!

ठिकाणी बंडखोरीचे सुर उमटत असून,याचा थेट परिणाम निवडणूक प्रचारावर होताना दिसणार आहे. कार्यकर्त्यांचा उत्साह कमी झाल्याने युतीच्या उमेदवारांसमोर अडचणी उभ्या राहिल्या आहेत.

नेतृत्व पातळीवर युतीचा निर्णय जरी राजकीयदृष्ट्या फायदेशीर वाटत असला,तरी तळागाळातील कार्यकर्त्यांचे मनोबल टिकवणे हे मोठे आव्हान ठरत आहे. वेळेत संवाद साधून नाराजी दुर न केल्यास,याचा फटका युतीला निवडणूक निकालात बसू शकतो,अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

युती झाल्याने दोन्ही पक्षांच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षे एकमेकांविरोधात राजकीय संघर्ष करणारे कार्यकर्ते अचानक एका व्यासपीठावर दिसणार आल्याने नेमकी भुमिका काय असावी, याबाबत स्पष्टता नसल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

ग्रामीण भागात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका या कार्यकर्त्यांच्या ताकदीवरच लढवल्या जातात. मात्र युतीच्या निर्णयामुळे अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना उमेदवारीपासून वंचित राहावे लागले आहे.

युतीमुळे विरोधकांवर मात करण्याचा नेतृत्वाचा प्रयत्न असला तरी तळागाळातील कार्यकर्त्यांचा उत्साह कमी झाल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. अनेक कार्यकर्ते थांबा आणि पाहा ची भुमिका घेत असल्याची चर्चा आहे. नेतृत्व पातळीवर युतीचा निर्णय घेतला गेला असला, तरी स्थानिक पातळीवर पक्षासाठी अहोरात्र मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्यांना विश्वासात न घेतल्याने नाराजी वाढत चालली आहे. याचा थेट परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर व निकालावर होण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

कार्यकर्त्यांना सोबत न घेतल्यास सेना-भाजप युतीला जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत अपेक्षित यश मिळेल का,हा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका म्हणजे ग्रामीण राजकारणाची खरी परीक्षा.ही परीक्षा फक्त नेत्यांची नसते,तर कार्यकर्ते, मतदार आणि स्थानिक नेतृत्व यांच्या विश्वासाची असते.मात्र याच निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीने राजकीय गणित जुळवण्याच्या नादात तळागाळातील वास्तवाकडे दुर्लक्ष केल्याचे चित्र दिसत आहे.

वर्षानुवर्षे एकमेकांविरोधात लढणाऱ्या कार्यकर्त्यांना अचानक एका झेंड्याखाली उभे राहण्याचा आदेश देण्यात आला. पण राजकारण फक्त आदेशावर चालत नाही, ते भावनेवर,निष्ठेवर आणि आत्मसन्मानावर उभे असते. उमेदवारी वाटपात निष्ठावान

## मशाल, तुतारी आणि पंजा यांना मिळणारा वाढता प्रतिसाद...!

कार्यकर्त्यांना डावलून 'सोयीस्कर' उमेदवार पुढे केल्याने असंतोष उफाळून आला आहे. युती सत्तेसाठी असली तरी कार्यकर्त्यांच्या मनात ती आत्मसन्मानाची माती करणारी ठरत आहे.

या असंतोषाचे प्रतिबिंब निवडणूक प्रचारात स्पष्टपणे दिसणार आहे. कार्यकर्त्यांची अनास्था युतीच्या उमेदवारांसाठी चिंताजनक ठरत आहे. याउलट विरोधकांनी ही संधी अचूक हेरली असून,सत्तेसाठी तत्त्वांचा बळी हा मुद्दा मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवला जात आहे. परिणामी मशाल, तुतारी आणि पंजा या चिन्हांकडे मतदारांचा कल वाढताना दिसतो आहे. ग्रामीण मतदार आता राजकीय सौद्यांना कंटाळलेला आहे. त्याला विकास हवा आहे,पण त्यासोबत स्वाभिमानही हवा आहे. पक्षनेतृत्वाने केलेल्या तडजोडींचा फटका थेट मतपेटीतून दिला जातो,हे यापूर्वीही अनेकदा सिद्ध झाले आहे. आज कार्यकर्त्यांची नाराजी हीच विरोधकांची ताकद बनत आहे आणि सत्ताधाऱ्यांसाठी ती डोकेदुखी ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर एक प्रश्न ठळकपणे उभा राहतो युती कोणासाठी? सत्तेसाठी की कार्यकर्त्यांसाठी? जर नेतृत्वाने वेळेत आत्मपरीक्षण केले नाही, तर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका सेना,भाजप युतीसाठी धोक्याची घंटा ठरू शकतात.कारण इतिहास सांगतो, तळागाळातील आवाज दुर्लक्षित करणाऱ्या युती फार काळ टिकत नाहीत. त्या मतदारच विसर्जित करतो.

नेतृत्वाच्या बंद खोलीत ठरलेली युती तळागाळातील कार्यकर्त्यांच्या गळ्यात मात्र जबरदस्तीने अडकवण्यात आली, हेच आजचे वास्तव आहे.

तळागाळातील असंतोष

वर्षानुवर्षे एकमेकांविरोधात संघर्ष करणारे कार्यकर्ते एका झटक्यात मित्र कसे होणार,हा प्रश्न कुणीच विचारात घेतला नाही.उमेदवारी वाटपात निष्ठेला दुय्यम स्थान देऊन सोयीस्कर समीकरणांना प्राधान्य देण्यात आले. परिणामी आम्ही पक्षासाठी झटलो. पण लाभ दुसऱ्यालाच. अशी भावना निर्माण झाली.

## योजनांची माहिती देण्यासाठी स्वतंत्र प्रचार कक्ष आवश्यक

नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)

नांदेड, दि. 22- अनेक शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत अपुरी किंवा ओझरती पोहोचते. त्यामुळे योजनांची सविस्तर, एकत्रित व सहज उपलब्ध माहिती मिळावी, यासाठी प्रत्येक विभागामध्ये स्वतंत्र प्रचार-प्रसिद्धी कक्ष असणे आवश्यक आहे. यामुळे नागरिकांचा सहभाग वाढून योजनांची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकते, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध पाणी व स्वच्छता विषयक योजनांची माहिती प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने नांदेड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षांतर्गत प्रचार-प्रसिद्धी कक्ष



व वॉर रूमची स्थापना करण्यात आली आहे. या वॉर रूमचे उद्घाटन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. या प्रसंगी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक मयूर आंदेलवाड, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संजय शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागात स्थापन करण्यात आलेल्या या वॉर रूममध्ये वॉटर बजेटिंग, सौर ऊर्जा वापर, शुद्ध पाणीपुरवठा, विहीर पुनर्भरण, सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्डे, प्लास्टिकमुक्तीसाठी जनजागृती, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, प्लास्टिक बंदी, ओला व सुका कचरा वर्गीकरण, कचरा कुंडीचा वापर, ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती, सुक्या कचऱ्याचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन तसेच सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांजवळ शोषखड्डे करण्याबाबतची माहिती देण्यात आली आहे. यासंदर्भातील माहितीपर पोस्टर्सही या कक्षात लावण्यात आले आहेत. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पाणी व स्वच्छता विषयक कामांसाठी स्वतंत्र गुणांकन देण्यात आले आहे.



## विहिरीत पडून ४४ वर्षीय व्यक्तीचा अपघाती मृत्यू

संगमनेर खुर्द : (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्यातील पेमगीरी येथील एक ४४ वर्षीय व्यक्तीचा विहिरीत पडून अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गुरुवार दिनांक २२ जानेवारी रोजी रोजी दुपारच्या एक ते दीड च्या सुमारास शेळीला चारा आणण्यासाठी गेलेल्या संदीप रमेश डूबे (वय ४४) यांचे विहिरीच्या कडेने जात असताना काठावरून जात असताना अचानक पाय घासरल्याने विहिरीत बुडून मृत्यू झाल्याचे दुःखद घटना घडली आहे.

## अहिल्यानगर संरक्षण उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून नावारूपाला येईल - पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

शिर्डी : (समर्थ गांवकरी)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेतून अहिल्यानगर जिल्हा भविष्यात देशाच्या संरक्षण उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून नावारूपाला येईल. देशाच्या संरक्षण क्षेत्रात प्रगती साध्य करणाऱ्या गणेश निबे यांच्या उद्योग समूहाचे यात महत्त्वपूर्ण योगदान राहील, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शिर्डी औद्योगिक वसाहतीमध्ये निबे समूहाने विकसित केलेल्या संरक्षण उत्पादन प्रकल्पाच्या कामाची औपचारिक सुरुवात मंत्री डॉ. विखे पाटील व सौ. शालिनी विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आली. याप्रसंगी महंत बापूजी, आमदार आशुतोष काळे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, नगराध्यक्षा सौ. जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर यांच्यासह निबे उद्योग समूहाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील म्हणाले, "निबे समूहाने संरक्षण उत्पादनात घेतलेली झेप कल्पनाशक्तीच्या पलीकडील आहे. औद्योगिक वसाहतीत जागा उपलब्ध झाल्यानंतर केवळ एका वर्षात १२ लाख चौरस मीटर आकाराचे शेड उभारून प्रत्यक्ष उत्पादन सुरू करणे, हे देशातील पहिलेच उदाहरण ठरले आहे. गणेश निबे यांनी जिद्द व मेहनतीने निर्माण केलेली ही ओळख सर्वांसाठी अभिमानाची आहे." पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेमुळेच निबे उद्योग समूह जागतिक स्तरावर पोहोचला आहे. समूहाने स्वतःचा उपग्रह विकसित करण्याचे काम हाती घेतले असून, यंदाच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राजपथावर होणाऱ्या संचलनात निबे समूहाने विकसित केलेले रॉकेट समाविष्ट असणार आहे, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी आवर्जून सांगितले.

शिर्डीला जसा आध्यात्मिक वारसा आहे, तशीच आता संरक्षण उत्पादनाची भूमी म्हणूनही ओळख निर्माण होईल. शिर्डी विमानतळ, रेल्वे स्टेशन व आता संरक्षण प्रकल्पामुळे या परिसराचा कायापालट होत आहे. या उद्योगामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असून, स्थानिक भूमिपुत्रांना यात प्राधान्य देण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात १५ दावोसयेथील परिषदेत झालेल्या गुंतवणुकीच्या करारांमुळे अहिल्यानगर जिल्ह्याला मोठी संधी मिळाली आहे, असे सांगत मंत्री डॉ. विखे पाटील यांनी याबद्दल राज्य शासनाचे आभार मानले.

उद्योजक गणेश निबे म्हणाले, श्री साईबाबांचे आशीर्वाद व मंत्री डॉ. विखे पाटील यांच्या पाठबळामुळे हा प्रकल्प उभा राहिला. अवघ्या नऊ महिन्यांत झालेले काम पाहण्यासाठी मार्च महिन्यात पाचही सैन्य दलांचे प्रमुख येथे येणार आहेत. आपला देश संरक्षण उत्पादने निर्यात करत असून, कोणत्याही संकटाचा सामना करण्यासाठी आवश्यक उत्पादन क्षमता देशात निर्माण झाली आहे. आमदार आशुतोष काळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

## ठाणे जिल्ह्यात 'अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' प्रभावीपणे सुरू - हजारो नागरिकांची तपासणी पूर्ण

ठाणे : (समर्थ गांवकरी)

ठाणे जिल्ह्यात मा. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली "अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान" दिनांक १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

या अभियानाची अंमलबजावणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या अधिपत्याखाली करण्यात येत असून, जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागांमध्ये ० ते ४० वयोगटातील नागरिकांची सिकलसेल तपासणी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. तसेच व्यापक जनजागृती मोहीमही राबविण्यात येत आहे.



अभियानाची सद्यस्थिती (दि. १५ ते २१ जानेवारी २०२६)

या कालावधीत जिल्ह्यातील विविध भागांमध्ये एकूण ३९,९७९ घरभेटी देण्यात आल्या. घरभेटीदरम्यान ७५ सिकलसेल रुग्णांना तसेच ७५१ सिकलसेल वाहक व्यक्तींना भेट देऊन आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले.

याच कालावधीत ३१,०२१ व्यक्तींच्या सोल्युबिलिटी तपासण्या करण्यात आल्या असून, त्यामध्ये २३६ संशयित सिकलसेल व्यक्ती आढळून आल्या आहेत. त्यापैकी २१४ नमुने इलेक्ट्रोफोरेसिस तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

कार्ड वितरणाची स्थिती

तपासणी पूर्ण झालेल्या व्यक्तींना पुढीलप्रमाणे कार्ड वितरित करण्यात आले आहे -

* ३०,२३७ व्यक्तींना पांढरे कार्ड
* ४४६ सिकलसेल वाहक व्यक्तींना पिवळे कार्ड
* १०१ सिकलसेल रुग्णांना लाल कार्ड

सिकलसेल ॲनिमिया हा एक अनुवांशिक रक्त विकार असून, वेळेवर तपासणी, समुपदेशन व योग्य उपचारांद्वारे त्याचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर टाळता येऊ शकतात. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ० ते ४० वयोगटातील सर्व नागरिकांनी सिकलसेल तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर पगरे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी व स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

## भाविकांची गर्दी

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील श्रद्धास्थान असलेल्या श्री सत्य गणपती मंदिरात गुरुवारी गणेश जयंतीचा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. या मुहूर्तावर अर्धापूरचे तहसीलदार तथा मंदिराचे प्रशासक रेणुकादास देवणीकर यांनी सपत्नीक श्री गणरायाला अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तन, महाअभिषेक घातला. या उत्सवाचे औचित्य साधून उद्योजक सुमीत मोरगे यांच्या वतीने मंदिराची अत्यंत मोहक अशा फुलांची सजावट करण्यात आली होती, ज्यामुळे मंदिर परिसराला प्रसन्न स्वरूप प्राप्त झाले होते. तसेच, माजी जि.प.सदस्य गंगाप्रसाद काकडे यांच्या वतीने भव्य अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.

## माजी विद्यार्थी समितीच्या अध्यक्षपदी अरविंद कंठाळे यांची निवड

तामसा : (समर्थ गांवकरी)

तामसा येथील पी एम श्री जिल्हा परिषद हायस्कूलच्या माजी विद्यार्थी च्या अध्यक्षपदी अरविंद कंठाळे यांची निवड करण्यात आली. तामसा येथील पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून व गुणवत्ता वाढीसाठी शासन निर्णय प्रमाणे माजी विद्यार्थी समितीच्या अध्यक्षपदासाठी अरविंद कंठाळे यांची निवड करण्यात आली या निवडीच्या सर्व माजी विद्यार्थी व तामसा, तामसा परिसरातुन या निवडीचा बद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, माजी उपसभापती केशव हरण, तामसा सरपंच आनंद घंटलवार, माजी सरपंच बालाजी




महाजन, माजी सरपंच माधव नारेवाड, मा जिप सदस्य दिलीप बास्टेवाड,वडगाव सरपंच गोविंद पवार,ग्रा प. सदस्य शिवराज वारकड, साहेबराव देशमुख, नामदेव भिसे, पत्रकार संजय राहुलवार, जुनेद पठाण, उपसरपंच खाजाभाई, प्रतिष्ठित व्यापारी रवी बंडेवार, विशाल परभणकर सह शालेय व्यवस्थापन समिती व शाळेच्या मुख्याध्यापक, शिक्षकानी या निवडीचं शुभेच्छा दिल्या.

## श्री राममंदिर प्राणप्रतिष्ठा निमित्त महाआरती



तामसा: (समर्थ गांवकरी)

अयोध्यामध्ये प्रभू श्री रामचंद्र यांच्या मंदिरच्या दुसऱ्या प्राणप्रतिष्ठा निमित्ताने तामसा येथील श्री राम मंदिरात महाआरतीचा आयोजन करण्यात आलं. अयोध्यामध्ये प्रभू राम यांच्या मंदिराच्या दुसऱ्या प्राणप्रतिष्ठा च्या वार्षिक पूर्ती निमित्ताने तामसा येथे श्री राम मंदिरात महाआरती च्या आयोजन करण्यात आलं या महाआरतीत शिवराज वारकड, महेश मठपती, अरविंद कंठाले,विशाल परभणकर साहेबराव देशमुख, शंकर मेंडके, पप्पू कदम,बाळू माळवे, ज्ञानेश्वर विभूते, अमोल तामसेकर, किरण वारकड,विजय काळे पाटील, संकेत देशमुख, विनोद रासमल्लेवार,रवी भोपळे,सह महिला मंडळ यांनी सहभाग नोंदविल्या.

# सांस्कृतिक कार्य खात्याचा भोंगळ कारभार

## मंत्र्यांच्या सूचनांनाही हरताळ; लोककलावंतांत तीव्र असंतोष

> नागपूरचे शाहीर राजेंद्र बावनकुळे यांनी निवड समित्यांमध्ये अनुभवी आणि कलेची जाण असलेल्या कलाकारांचा समावेश करण्याची मागणी केली आहे. "अनेक ठिकाणी अनुभवी कलाकारांऐवजी हौशी व कलेची जाण नसलेल्या लोकांचा भरणा केला जात आहे. त्यामुळे योग्य कलावंतांना न्याय मिळत नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

मुंबई : (समर्थ गांवकरी)

सांस्कृतिक कार्य खात्याच्या ढिसाळ आणि असंवेदनशील कारभारामुळे राज्यातील राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेचा लाभ घेणाऱ्या लोककलावंतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अद्याप सहा-सात जिल्ह्यांत मानधन निवड समित्याच गठीत झालेल्या नाहीत, तर अनेक जिल्ह्यांतील सन २०२३ पासूनचे ऑफलाईन (प्रत्यक्ष) अर्ज धूळखात पडून असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन तांत्रिक अडचणी दूर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. मात्र, या सूचनांकडे विभागातील अधिकारी सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप कलावंतांकडून करण्यात येत असून त्यामुळे संपूर्ण राज्यात प्रचंड असंतोष पसरला आहे.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेअंतर्गत एप्रिल २०२४ मध्ये सरसकट दरमहा पाच हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या राज्यातील सुमारे ३८ हजार वयोवृद्ध साहित्यिक व कलावंत या योजनेचा लाभ घेत असून यासाठी शासनाला सुमारे २०० कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करावी लागत आहे.

मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत सांस्कृतिक कार्य खात्याच्या भोंगळ कारभारामुळे ही योजना लोककलावंतांसाठी डोकेदुखी ठरत आहे. नवीन शासन निर्णयानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मानधन निवड समिती गठीत करण्याची तरतूद असली तरी अनेक जिल्ह्यांत या समित्यांच्या बैठकींकडे जिल्हाधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष लक्ष नसते. बहुतांश वेळा ते आपले प्रतिनिधी पाठवित असल्याने निर्णय प्रक्रियेत दिरंगाई होत आहे.

याशिवाय, निवड समितीचे सदस्य सचिव म्हणून प्रशासकीय काम पाहणारे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अनेकदा समितीच्या बैठकीत एकमताने घेतलेले निर्णय ऐनवेळी बदलून वेगळेच निर्णय घेत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे अशासकीय सदस्य आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये वारंवार वाद निर्माण होत असून समितीचे काम अधिकच रखडत आहे.

ऑफलाईन व ऑनलाईन अशा दुहेरी प्रक्रियेमुळेही अनेक कलावंत त्रस्त झाले आहेत. सध्या बहुतांश कलावंतांनी ऑनलाईन अर्ज केले असले तरी त्यांच्या अर्जाची सद्यस्थिती काय आहे, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती मिळत नाही. योग्य मार्गदर्शनाचा अभाव असल्याने उपेक्षित कलावंत संभ्रमात सापडला आहे.

सन २०२३ पासूनचे प्रत्यक्ष (ऑफलाईन) केलेले अनेक अर्ज काही जिल्ह्यांत कार्यालयांत सापडेनासे झाले असून समित्यांचे काम कासवगतीने सुरू असल्याने लोककलावंतांवर अन्याय होत आहे. तांत्रिक अडचणींमुळे काही कलावंतांच्या बँक खात्यांत वेळेवर मानधन जमा होत नसल्याने त्यांना दोन-दोन महिने दैनंदिन गरजा भागवताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मात्र मंत्रालयात बसलेल्या सांस्कृतिक कार्य विभागातील अधिकाऱ्यांना या गंभीर समस्यांचे कोणतेही सोयरसुतक नसल्याची भावना कलावंतांतून व्यक्त होत आहे.

या संदर्भात सोलापूर जिल्ह्यातील निवड समितीबाबत बोलताना लोकशाहीर सुभाष गोरे यांनी सांगितले की, "आमच्या जिल्ह्यात बराच काळ मानधन निवड समितीच गठीत झाली नव्हती. त्यामुळे सन २०२२ पासूनची प्रकरणे प्रलंबित राहिली. यापूर्वी ऑफलाईन केलेले अर्ज आता संबंधित कार्यालयांत सापडत नाहीत, हे अत्यंत विदारक चित्र आहे."

खान्देशातील ज्येष्ठ तमाशा कलावंत शेषराव गोपाळ यांनी सांगितले की, "जिल्हाधिकारी स्तरावर समिती गठीत झाली असली तरी तिचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. अनेक वर्षांची प्रकरणे प्रलंबित आहेत. या प्रशासकीय गोंधळामुळे एका लाभार्थी कलावंताचे दरवर्षी पाच हजार रुपये प्रति महिना या हिशोबाने साठ हजार रुपयांचे नुकसान होते.

# सन्मित्राचा नाराजीनामा!

राजकारणात सर्वत्र आसुरी स्पर्धा सुरू असून कोणीच थांबायला तयार नाही,' ही सल ज्येष्ठ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या ओठी आली. योगायोगाने त्यानंतर लागलीच भाजपचे आमदार संदीप जोशी यांनी राजसंन्यास घोषित केला. कार्यकर्त्यांनी घेराव घातला. रास्ता रोको केला. संदीप जोशी देवाभाऊंच्या विश्वासातले आहेत. साक्षात मुख्यमंत्र्यांसोबत कौटुंबिक जवळीक असल्याने त्यांच्या अचानक 'थांबण्याने' भाजपमध्ये अंतस्थ वादळ आले आहे. संदीप जोशी यांची विधान परिषदीय कारकीर्द मेमध्ये थांबणार आहे. सध्याच्या राजकीय विरक्तीनंतर सेवा, क्रीडा आणि वैद्यकीय क्षेत्राच्या रचनात्मक कामात झोकून देण्याचा त्यांचा इरादा आहे. मानसिक आणि शारीरिक अस्वस्थतेतून त्यानी असा निर्णय घेतल्याचे समजते. 'या क्षणी मी काय बोलणार?' ही प्रतिक्रिया देत मुख्यमंत्र्यांनी दावोस गाठले. घनिष्ठ मैत्रीची गुंतवणूक उसवल्याचे बघून त्यांनाही धक्का बसला असेल. जोशींच्या 'अलिप्त हत्यारा' चा परिणाम न होऊ देता दावोसच्या आर्थिक महाओघात ते आकंठ लिप्त झाले. अनेक वर्षांपूर्वी काँग्रेसमधील नाराजीनामा गाजला होता. मार्च १९६६ मध्ये शेतकरी कामगार पक्षाने मुंबईत एक लाख बैलगाड्यांचा मोर्चा काढला. शेतकऱ्यांची विराट शक्ती बघून मुख्यमंत्री वसंतराव नाईक अचंबित झाले. उद्धवराव पाटील, भगवानराव सूर्यवंशी, एन.डी.

## संपादकीय



पाटील, एस. एम. पाटील, दत्ता पाटील, दि. बा. पाटील असे दिग्गज मोर्चात होते. 'विरोधी पक्षाचा आब राखला जावा,' ही गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांची भूमिका होती. मोर्चाला परवानगी दिल्याने देसाईंवर स्वपक्षातूनही शरसंधान झाले. गुजराती लॉबी सक्रिय झाली. नेहरू कुटुंबीयांशी जवळीक असणारे नागरी पुरवठामंत्री होमी तल्यार खान आणि शिक्षण राज्यमंत्री डॉ. एन. ए. कैलास यांनी मंत्रिपदाचा राजीनामा देऊन हा पेच सोडविला. कोयना भूकंपग्रस्तांचे तळमळीने पुनर्वसन केल्यानंतरही बाळासाहेब देसाईंना पुढे महसूल मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्या काळात हे आकस्मिक 'थांबणे' गाजले होते. संदीप जोशी यांची नाराजी तुलनेने पक्षांतर्गत आहे. नाराजीनाम्यांच्या गर्दीत बैलगाड्यांचे 'बळी' निनादत राहिले. आपल्याला विश्वासात न घेता प्रभा राव यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपद दिल्याच्या असंतोषातून १९८५ मध्ये स्वत: वसंतदादा पाटील यांनीही मुख्यमंत्रिपद सोडले होते. राजभवनवरून स्वत:च्या गाडीने ते थेट माहीमच्या घरी गेले होते.

नागपुरात अशा भूतकाळातील नाराजीनाम्यांचा स्मृती ताज्या होत आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या राजकारणाची सुरुवात वयाच्या २१ व्या वर्षी झाली. तेव्हा ते 'भाजयुमो' चे शहर अध्यक्ष होते. १९९२ मध्ये ते महापालिकेच्या रिंगणात उतरले. त्या वेळी फडणवीस यांच्यासाठी रामनगरातून 'थांबलेले' नगरसेवक होते, प्रकाश साठे. त्यांनी एका युवा आणि तल्लख उमेदवाराला संधी दिली. त्यातून फडणवीस सर्वांत तरुण नगरसेवक ठरले. आज साठे हयात नाहीत. प्रख्यात क्रीडा संघटक म्हणून त्यांची ओळख नागपूरने जपली आहे. मुख्य म्हणजे, ते संदीप जोशी यांचे सासरे होत. आटोपलेल्या निवडणुकीत भाजपचे बहुतेक उमेदवार आक्रमक दिसले. सत्तेची साठमारी भविष्यात विक्राळ रूप घेईल. राजकारण थांबवून समाजकारणाचा आदर्श प्रस्थापित करणाऱ्या नानाजी देशमुखांना संघपरिवारात आदराचे स्थान आहे. मुख्यमंत्री दावोसहून परतल्यावर सन्मित्र संदीप जोशी त्यांच्यावर पुन्हा वैतागतील. भांडतीलही. कदाचित तलवार म्यानही करतील. भाजपमध्ये असे अनेक अश्वत्थामा आहेत. 'आजकाल ताण कमी येतो' असे तर्रीपोहा उद्गार काढले असले तरी पूर्वापारचे संघनिकष आणि पक्षविस्तारानंतरच्या तडजोडींचे दडपण देवाभाऊंवर किती असेल, हा देखील प्रश्नच आहे. मुख्यमंत्री नवा रामशास्त्री बाणा दाखवितात की जुन्या रामनगरचे स्मरण, हे दोन-चार दिवसांत कळेल.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ७४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | 5 | | | 8 | | 6 | |
| | | 6 | 1 | 4 | | | | |
| | 9 | 8 | | 6 | | 7 | | |
| | | 1 | 7 | 2 | | | | 6 |
| 2 | 6 | | | | | | 7 | 5 |
| 5 | | | | 3 | 4 | 1 | | |
| | | 4 | | 7 | | 9 | 1 | |
| | | | | 5 | 1 | 6 | | |
| | 1 | | 4 | | | 5 | 3 | |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

**सूडोकू क्र. ७३ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 9 | 5 | 4 | 7 | 6 | 2 | 8 | 1 |
| 4 | 7 | 6 | 1 | 2 | 8 | 5 | 9 | 3 |
| 8 | 2 | 1 | 5 | 3 | 9 | 4 | 7 | 6 |
| 9 | 5 | 3 | 2 | 8 | 4 | 6 | 1 | 7 |
| 1 | 6 | 2 | 3 | 9 | 7 | 8 | 4 | 5 |
| 7 | 4 | 8 | 6 | 1 | 5 | 9 | 3 | 2 |
| 2 | 8 | 7 | 9 | 6 | 1 | 3 | 5 | 4 |
| 6 | 1 | 4 | 8 | 5 | 3 | 7 | 2 | 9 |
| 5 | 3 | 9 | 7 | 4 | 2 | 1 | 6 | 8 |

उत्तर उद्याच्या अंकात

**पंचांग**
२३ जानेवारी २०२५
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
माघ शीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- उत्तरायणारंभ
मास- माघ
ऋतु- सौर शिशिर
शुक्ल पक्ष
तिथि:पंचमी २५:४६:१८+

नक्षत्र:पूर्वाभाद्रपद १४:३२:४३
योग:परिध १५:५८:२९
करण:बव १४:१०:२५
करण:बालव २५:४६:१८+

## उपदेशाचे डोस

### जिद्द

डॉ. येलप्रगदा सुब्बाराव हे आंध्र प्रांतातील एक विख्यात वैद्य होते. त्यांच्या घरची परिस्थिती गरिबीची होती. त्यांच्या भावाचा मृत्यू स्प्रू म्हणजे प्रवाहिका नावाच्या रोगाने झाला. त्यावर त्यावेळी औषध नसल्याने ते औषध तयार करण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली व ती शेवटी सिद्धीस नेली. मद्रास विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. मित्रमंडळींच्या सहाय्याने ते इंग्लंडला गेले. लंडन विद्यापीठात प्रवेश केला. नंतर अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश मिळवून १९३० मध्ये त्या विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. तेथेसुद्धा पैशाच्या अडचणीमुळे हॉस्पिटलमधील शिपायाचे काम करणे, प्रयोगासाठी बेवारशी कुत्री व मांजरे पकडणे वगैरे हलकी कामे करावी लागली पण त्यांनी त्यात कमीपणा मानला नाही. दूध व शिजवलेले पावटे हा त्यांचा आहार होता. लॅडर्ली लॅबोरेटरीचे १९४२ मध्ये प्रमुख झाले. टेरॉटटेरिन व ॲमिनॉप्टिंरिन नावाची कर्करोगावर व ल्युकेमियावर उपयोगी पडणारी औषधे त्यांनी तयार केली. लेडर्ली संस्थेतील वाचनालयास व भारतातील त्या कंपनीच्या कारखान्यास त्यांचे नाव देण्यात आले.

कथा उपदेश : जिद्दीने प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते व नाव कमावता येते.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५५६ - जगातील सर्वात मोठा भूकंप चीनच्या शांक्सी प्रांतात घडला. अंदाजे ८,३०,००० ठार.
- १५७९ - युट्रेख्टचा तह मंजूर. नेदरलँड अस्तित्त्वात.
- १७१९ - रोमन पवित्र साम्राज्यात लिच्टेन्स्टेन या राज्याची निर्मिती.
- १८५५ - मिनेसोटात मिनीआपोलिसमध्ये मिसिसिपी नदीवर पहिला पूल बांधला गेला.
- १८७० - मोन्टानात अमेरिकन घोडदलाने १७३ बायका व मुलांची कत्तल केली.
- १९४३ - दुसरे महायुद्ध - ब्रिटीश सैन्याने लिब्याची राजधानी ट्रिपोली जिंकले.

### राष्ट्रीय

- १९९३ - इंडियन एअरलाईन्स बी ७३७ ला औरंगाबादेत अपघात, ६१ ठार.
- २००८ - मुंबईचे सहपोलीस आयुक्त (प्रशासन) हेमंत करकरे यांची एटीएसच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली.


### जन्म

- १७१९ - जॉन लँडन, इंग्लिश गणितज्ञ यांचा जन्म.
- १७३७ - जॉन हॅन्कॉक, अमेरिकन क्रांतिकारी यांचा जन्म.
- १८९७ - नेताजी सुभाषचंद्र बोस, भारतीय क्रांतिकारी यांचा जन्म.
- १९२६ - बाळासाहेब ठाकरे, शिवसेनाप्रमुख यांचा जन्म.
- १९४७ - मेगावती सुकर्णो पुत्री, इंडोनेशियाची राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- १००२ - ऑट्टो तिसरा, पवित्र रोमन सम्राट यांचे निधन.
- ११९९ - याकुब, खलिफा यांचे निधन.
- १५६७ - ज्याजिंग, चीनी सम्राट यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ७४



**आडवे शब्द**

१. राष्ट्रभाषेत शपथ
४. विक्रमवीर सचिनचे आडनाव
८. शिव! शिव!
१२. मर्यादा
१३. रम्य, सुंदर स्थान
१४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
१६. आंध्रच्या किनाऱ्यालगतचे बंदर
१८. उष्ण
१९. मला
२१. वेळ हिंदीत
२३. उघडणे
२५. गावातील टवाळ
२६. दात
२७. कबूतर
३०. वडिलांचा भाऊ
३१. रागाचे मोजमाप!
३२. ओलसर हवा
३४. वाळवी
३७. कायद्याप्रमाणे
३८. पैंजण
३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना
४१. नाजूक
४३. गाडीचे पाय
४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द
४५. जाड दोर
४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल
४७. खोलवर नसलेले, वरपांगी
५०. एक अप्सरा
५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात
५२. वसवलेली वस्ती
५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार
५६. वजन, बोजा
५७. सूर्याचे एक नाव
५८. उगीच
६०. नगर, गाव
६२. पवित्र
६३. कौसल्यापुत्र
६५. मार्गस्थ
६६. घरातील मोठी माणसे
६८. पूर्वसूचना न देता
७१. 'कशाला उगाच' असा त्रास
७४. तापापूर्वी येणारे शहारे
७७. युवक
७८. या अभिनेत्रीने 'श्याम ची आई' अजरामर केली
७९. जादा कामाचा दिवस!

**उभे शब्द**

१. खबदाड
२. सरळ लांब वासा
३. छेड काढणारा
५. बसल्याजागी लागलेली निद्रा
६. पांढुरका रंग
७. दारूचा एक प्रकार
८. दुर्लक्ष, हेळसांड
९. निच, विश्वासघातकी
१०. मातीचा कण
११. मालक
१५. पळणे
१६. अंजन
१७. आडमुठा, हट्टी
१९. चौथा हिस्सा
२०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा
२१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ
२२. माज
२४. भांडणात मध्यस्थी करणारा
२५. गवई
२७. तेच ते पुन्हा पुन्हा
२८. उणीव, कसर
२९. चिंतन
३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे
३१. बाळाचा मुका
३३. मऊशार हरळीसारखे कापड
३५. मिळमिळीत
३६. पृथ्वी
३७. शंकराचे एक नाव
४०. व्यवस्थापन
४१. कोमल, नाजूक, अपक्व
४२. चटकन
४३. एक पालेभाजी
४६. सीतेची जुळी मुले
४७. वाहन नेणे
४८. रममाण, निमग्न
४९. मांडणी
५३. मुलांचा एक बैठा खेळ
५४. घटस्फोट
५६. हमाल
५८. उलट, विरुद्ध
५९. फणसाचा एक प्रकार
६१. शंकर, प्रत्येक
६३. पौर्णिमा
६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र
६६. पहिला ऋतू
६७. रामबंधु
६९. कोवळी फांदी
७०. डुक्कर
७२. राबता, सवय
७३. दुबळा, गरीब
७५. पावसाची झड
७६. पडसे

**शब्दकोडे क्र. ७३ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.वानगी ३.बात मीदार ७.चमचम १०.कव १०अ.ममता १२.नमकहराम १४.आडाखा बांधणे १७.मळ १८.काना १९.रचना २१.आपादमस्तक २३.भाकरी २५.रकाना २७.वीर २९.तडा ३०.जहाज ३२.रसद ३४.सालस ३६.जारणमारण ३८.मस ४०.बरकत ४१.गड ४२.खस ४३.काडीमोड ४४.गर ४५.अर्चना ४६.सरकार ४८.सहाणखोंड ५०.आसपास ५१.जाण ५२.पतदार ५५.मोहनदास ५७.नजरानजर ६१.सतत ६३.नवी ६४.राखणदार ६७.लवकर ६८.रामदास ७१.वास ७२.लकवा ७३.कणीक ७४.खप ७६.रस्ता ७७.बाप्पा ७८.रवाळ ७९.सरबत

उभे उत्तर : १.वाकडातिकडा २.नवखा ३.बाता ४.मीन ५.दाम ६.रकमपात ७.सारा ८.मग ९.महिना १०.मध ११.मणेर १३.हळद १५.बांग १६.विनाकारण १८.काकवी २०.चर २२.मतलब २३.भातपोळी २४.वहाण २६.नारा २८.रजत ३०.जरड ३१.जमाखर्च ३३.दमडी ३५.सरदार ३६.जागरण ३७.रसना ३९.समोरासमोर ४३.कापूस ४४.गहाणखत ४५.अडत ४६.सधन ४६अ.कानस ४७.रक्षा ४८.सजा ४९.खोपट ५३.दानवीर ५४.सरसरीत ६१.सतलज ६२.तलवार ६३.नकटी ६५.खसखस ६६.दावा ६९. मकर ७०.सबळ ७३.कप्पा ७५.पर

# अंमली पदार्थ तस्करीत पोलिसाला अटक

## कोट्यावधी रुपयांचा ड्रग्स हस्तगत



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) व शिरूर पोलीस ठाण्याच्या पथकाने केलेल्या संयुक्त कारवाईत शिरूर शहरात १ किलोहून अधिक मेफेड्रोन (एमडी) अंमली पदार्थासह गॅरेज चालकाला अटक करण्यात आली असून या प्रकरणाला आता वेगळेच वळण लागले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचा अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील एका पोलीस कर्मचाऱ्याशी निकट संबंध असल्याची गंभीर माहिती समोर आल्याने पोलीस खात्यातच खळबळ उडाली आहे.

मेफेड्रोन अर्थात एमडी या अंमली पदार्थाची बेकायदेशिर विक्री करताना पुणे पोलिसांनी शिरुरमध्ये एका गॅरेजमालकाला पकडले. मात्र, त्याला एक किलोहून अधिक वजनाचा हा अंमलीपदार्थ नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असणाऱ्या शामसुंदर गुजर याने विकल्याची धक्कादायक बाब समोर आली. पुणे पोलिसांनी या खाकी वदतील शामसुंदर विश्वनाथ गुजर (बक्कल नं. २२०५) या ड्रग्जमाफीयाला पहाटे चार वाजता बेड्या ठोकल्या आणि त्याची रवानगी कोठडीत केली.

भारत सरकारच्या नशामुक्त भारत अभियानाच्या पार्श्वभूमीवर पुणे ग्रामीण जिल्ह्यात अंमली पदार्थविरोधात कठोर कारवाईचे आदेश पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी दिले होते. त्यानुसार १७ जानेवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शिरूर परिसरात गस्त घालत असताना अंमली पदार्थांची बेकायदेशीर विक्री होणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या मिळालेल्या माहितीनुसार, शिरूर शहरातील डंबेनाला परिसरात राहणारा गॅरेज चालक शादाब रियाज शेख (वय-४१) हा बाबुरावनगर परिसरातील मोकळ्या मैदानात एमडी विक्रीसाठी येणार होता. उपविभागीय पोलीस अधिकारी शिरूर विभाग यांची परवानगी घेऊन १८ जानेवारी रोजी मध्यरात्री छापा टाकण्यात आला. छाप्यात आरोपीच्या ताब्यातून १ किलो ५२ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन (एमडी) व एक दुचाकी असा सुमारे २ कोटी १० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या कारवाईनंतर मिळालेल्या अधिक तपासात धक्कादायक बाब समोर आली असून, अटक करण्यात आलेल्या शादाब शेखचा अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील एका पोलीस कर्मचाऱ्याशी थेट संबंध असल्याचे उघड झाले आहे.

सदर कर्मचारी अहिल्यानगर पोलीस अधीक्षक कार्यालयातील एका शाखेत कार्यरत आहे. पुणे ग्रामीण एलसीबी पथकाने त्या कर्मचाऱ्याला मंगळवारी सायंकाळी ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. ड्रग्स तस्करीसारख्या गंभीर गुन्ह्यात पोलीस दलातीलच कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याने अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.

# ई-पीक पाहणीसाठी प्रशासन 'मिशन मोड'वर

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**



रब्बी हंगामातील पिकांची 'ई-पीक पाहणी' नोंदविण्यासाठी आता अवघे काही दिवस उरले आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी तातडीने पिकांची नोंदणी करावी, यासाठी महसूल प्रशासन आता ॲक्शन मोडमध्ये आले आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी व मार्गदर्शनासाठी वरिष्ठ अधिकारीच आता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आहेत. शेतकरी स्तरावरून ई-पीक पाहणीसाठी २४ जानेवारी २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. जे शेतकरी या मुदतीत आपल्या पिकांची ई- पीक पाहणी ॲपव्दारे नोंद करणार नाहीत, त्यांना पीक विमा, पीक कर्ज व नैसर्गिक आपत्तीच्या काळात मिळणारे सरकारी अनुदान मिळण्यास अडचणी येऊ शकतात. कोणत्याही शासकीय कृषी योजनांचा लाभ घेता येत नाही. सध्याची स्थिती पाहता शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढविण्यासाठी प्रशासन आता युध्दपातळीवर प्रयत्न करत आहे. नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम व जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूचनेनुसार महसूल विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष फील्डवर उतरले आहेत. शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे, पोहेगाव व देर्डे या गावांना भेटी दिल्या. विशेष म्हणजे देर्डे येथे अपर जिल्हाधिकारी कोळेकर यांनी केवळ पाहणीच केली नाही, तर शेतकऱ्यांच्या अडी-अडचणी समजून घेत चक्क स्वतःच्या मोबाईलवरून शेतकऱ्यासमक्ष त्यांच्या पिकाची 'ई-पीक पाहणी' नोंदणी करून दिली. अधिकाऱ्यांच्या या तत्परतेमुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. दुसरीकडे, अहिल्यानगरचे अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांनीही अहिल्यानगर तालुक्यातील चास व पारनेर तालुक्यातील सुपा, महासने या गावांमध्ये जाऊन पिकांची पाहणी केली. शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील सर्व उपविभागीय महसूल अधिकारी व तहसीलदार बुधवारी प्रत्यक्ष बांधावर उपस्थित होते. अंतिम मुदतीला आता अवघे काही तास शिल्लक आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत २४ जानेवारीपर्यंत आपली ई- पीक पाहणी पूर्ण करावी, जेणेकरून भविष्यातील शासकीय लाभांपासून शेतकरी वंचित राहणार नाहीत, असे कळकळीचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# महापौरपदाची आरक्षण सोडत जाहीर

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

राज्यातील २९ महानगरपालिकेतील महापौरपदासाठी आज आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. अहिल्यानगर महानगरपलिकेसाठी महापौरपद हे महिला ओबीसी प्रवर्गासाठी राखीव झाले आहे. नगर शहरात भाजपा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाला सुस्पष्ट बहुमत असल्याने पहिल्या टर्ममध्ये नेमका भाजपाचा की राष्ट्रवादीचा महापौर होणार याकडे आता नगरकरांचे लक्ष लागले आहे.

अ.क्र. महानगरपालिकेचे नाव आरक्षित प्रवर्ग

1) बृहन्मुंबई (बीएमसी) - सर्वसाधारण- महिला

2) ठाणे - अनुसूचित जाती (एससी)

3) कल्याण-डोंबिवली - अनुसूचित जमाती-एसटी (पुरुष)

4) नवी मुंबई - सर्वसाधारण- महिला

5) वसई-विरार - सर्वसाधारण-महिला / पुरूष

6) भिवंडी-निजामपूर - सर्वसाधारण- महिला / पुरूष

7) मीरा-भाईंदर - सर्वसाधारण- महिला

8) उल्हासनगर - ओबीसी- महिला किंवा पुरूष

9) पुणे - सर्वसाधारण- महिला

10) पिंपरी-चिंचवड सर्वसाधारण- महिला / पुरूष

11) नागपूर - सर्वसाधारण- महिला

12) अहिल्यानगर - ओबीसी- महिला

13) नाशिक - सर्वसाधारण- महिला

14) छत्रपती संभाजीनगर - सर्वसाधारण- महिला किंवा पुरुष

15) अकोला - ओबीसी-महिला

16) अमरावती- सर्वसाधारण- महिला किंवा पुरुष

17) लातूर - अनुसूचित जाती (एससी)- महिला

18) नांदेड-वाघाळा - सर्वसाधारण -महिला

19) चंद्रपूर - ओबीसी- महिला

20) धुळे - सर्वसाधारण- महिला

21) जळगाव - ओबीसी- महिला

22) मालेगाव - सर्वसाधारण- महिला

23) कोल्हापूर - ओबीसी- महिला किंवा पुरूष

24) सांगली-मिरज-कुपवाड - सर्वसाधारण

25) सोलापूर - सर्वसाधारण- महिला / पुरूष

26) इचलकरंजी - ओबीसी- महिला किंवा पुरूष

27) जालना - अनुसूचित जाती (एससी)- महिला

28) पनवेल - ओबीसी- महिला किंवा पुरूष

29) परभणी - सर्वसाधारण- महिला / पुरूष

# २६ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

शहरातील बालिकाश्रम रोड परिसरात असलेल्या एका हॉस्टेलच्या इमारतीवरून पडल्याने २६ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. प्रतीक ईश्वर तवटे असे मृत तरुणाचे नाव असून, ही घटना बुधवारी सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मयत प्रतीक तवटे हा न्यू आर्ट्स कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या बालिकाश्रम रोडवरील एका हॉस्टेलमध्ये वास्तव्यास होता. बुधवारी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास तो इमारतीवरून खाली पडला. या अपघातात तो गंभीर जखमी झाला होता. रुग्णवाहिका चालक अतुल यादव शिंदे यांनी त्याला तातडीने उपचारासाठी जिल्हा सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

# ज्ञानसंपदा शाळेतील माजी विद्यार्थ्यांनी दिला आठवणींना उजाळा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



ज्ञानसंपदा शाळेत माजी विद्यार्थी संघाचा मेळावा नुकताच आयोजित करण्यात आला. माजी विदयार्थ्यांनी शाळेचा स्नेहभाव वृद्धिंगत होण्यासाठी सतत शाळेशी संपर्कात राहुन शाळेसाठी, सध्या शिक्षण घेत असणाऱ्या विध्यार्थ्यासाठी आपले योगदान द्यावे. शाळेच्या नवनवीन उपक्रमात आपल्या उच्च शिक्षणाचा, व्यवसायाचा, नोकरीचा अनुभव सांगून मुलांना मार्गदर्शन करावे. वेगवेगळ्या प्रकारचे करिअर मार्गदर्शन सत्र आयोजित करावे, या मुख्य उद्धेशाने व प्रेरणेने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

सन 2013-14 ते 2024-24 या शैक्षणिक वर्षातील असंख्य विदयार्थ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला, शाळेने आपल्याला दिलेले संस्काराचे धडे आपल्या पुढील शिक्षणात तसेच दैनंदिन जीवनात अत्यंत उपयुक्त ठरले याविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या .

या माजी विद्यार्थी संघाची एक कोअर कमिटी तयार करण्यात आली जेणेकरून वर्षभर विविध उपक्रम राबविता येतील तसेच शाळेशी आपली नाळ सदैव जोडून राहील . संस्थेचे खजिनदार अविनाश बोपर्डीकर, मुख्याध्यपिका शिवांजली अकोलकर, सहशिक्षक श्री. कैलास जाधव व विद्यार्थी प्रतिनिधी महेश नेमाने,शुभम मडके, ऋषी घुले, रोहित भोजने अंजनी जोशी तनवी बोकील यांचा समावेश केला गेला.

याप्रसंगी संपदा विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री प्रवीण बजाज उपाध्यक्ष श्री. मिलिंदजी गंधे,मानद सचिव अरुण कुलकर्णी यांनी माजी विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील कामगिरीबद्दल तसेच शाळेशी ठेवलेल्या ऋणानुबंधाबद्दल व सहकार्याबद्दल कौतुक करत अभिनंदन करत,माजी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. एक आदर्श नागरिक व संस्कारी विद्यार्थी घडवणे या उदात्त हेतूने या संस्थेची स्थापना कशी केली, याबद्दल संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी याबद्दल आपल्या मनोगतात भावना व्यक्त केल्या.

आपल्या मनोगतात अनेक विध्यार्थ्यांनी शाळेच्या दिवसातील आठवणीना उजाळा देत, यापुढे शाळेतील विध्यार्थ्यांना अनुभव विशद करण्याचे व मार्गदर्शन करण्याचे तसेच येणाऱ्या शैक्षणिक वर्षात दोन मुख्य उपक्रम शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी राबविण्याचे आश्वासन दिले. शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर व सहशिक्षक श्री कैलास जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना शाळेकडून खास भेटवस्तू ही देण्यात आल्या. याप्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.सूत्रसंचालन अंजनी जोशी तनवी बोकील, मनाली कुलकर्णी यांनी केले.

# महापौरपदासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस व भाजपकडे प्रबळ दावेदार

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**




अहिल्यानगर येथील महापालिकेचे महापौर पद ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहे. राज्यातील महापालिकांसाठी मुंबईत आरक्षणाची सोडत काढण्यात आली. त्यामध्ये अहिल्यानगर महापालिकेचे महापौर पद ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. महापालिकेत राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) व भाजप यांच्या युतीने निर्विवाद बहुमत प्राप्त केले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे संख्याबळ अधिक असल्याने महापौर पदावर राष्ट्रवादीचा दावा प्रबळ ठरणार आहे. ओबीसी महिला प्रवर्गातून राष्ट्रवादी व भाजप या दोन्ही पक्षांकडे प्रत्येकी तीन महिला निवडून आलेल्या आहेत. मात्र ओबीसी प्रमाणपत्र असलेली महिला खुल्या प्रवर्गातून निवडून आलेली असली तरी ती महापौर पदाच्या निवडीसाठी पात्र ठरू शकत असल्याने अहिल्यानगरच्या महापौर पदासाठी इच्छुकांची संख्या वाढणारी आहे. महापालिकेच्या १७ प्रभागातून ६८ जागा आहेत. निवडणुकीत आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखालील अजित पवार गटाला २७, भाजपला २५, शिवसेना (शिंदे गट) १०, ठाकरे गट १, कॉंग्रेस २, एमआयएम २, बहुजन समाजवादी पक्ष १ असे संख्याबळ मिळालेले आहे. यापूर्वी निवडणुकीच्या आधीच महापौर पदाचे आरक्षण जाहीर केले जात असे. यंदा प्रथमच निवडणूक झाल्यानंतर महापौर पदाच्या आरक्षणाची सोडत मुंबईत मंत्रालयात काढण्यात आली. काल रोजी काढलेल्या आरक्षण सोडतीमध्ये अहिल्यानगर महापालिकेचे महापौर पद ओबीसी महिलेसाठी आरक्षित झाले आहे. राष्ट्रवादी व भाजप युतीमध्ये राष्ट्रवादीची संख्याबळ अधिक आहे. मात्र भाजपचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी अद्याप महापौर पदाचा निर्णय झालेला नाही असे सांगितलेले आहे. त्यामुळे दोन्ही पक्षात महापौर पदासाठी रस्सीखेच होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. पालकमंत्री विखे यांनी प्रतिष्ठेसाठी भाजपकडे हे पद हवे असा आग्रह धरल्यास ते भाजपला मिळू शकते. अन्यथा अधिक संख्या बळाच्या आधारावर आमदार संग्राम जगताप ते राष्ट्रवादीच्या पदरात पाडून घेतील. राष्ट्रवादीकडे ओबीसी महिला प्रवर्गातून निवडून आलेल्या सुजाता पडोळे, वर्षा काकडे, अश्विनी लोंढे आशा डागवाले नगरसेविका आहेत तर भाजपकडे शारदा ढवण, आशा कातोरे व पुष्पा बोरुडे सुनीता फुलसौंदर यांचा समावेश आहे. ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेल्या नसल्या तरी ओबीसी महिला म्हणून राष्ट्रवादीच्या ज्योती गाडे, आशा डागवाले, सुनीता फुलसौंदर यांचीही नावे महापौर पदासाठी चर्चेत येऊ शकतात.

महापौर पदाचे आरक्षण जाहीर झाले असले तरी अद्याप महापौर पदाच्या निवडीची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. पिठासन अधिकारी म्हणून जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड सभा होईल.

# कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन

**नवी मुंबई: (समर्थ गांवकरी)**

हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या 350 व्या शहिदी समागम वर्षानिमित्त दि.24 व 25 जानेवारी रोजी नांदेड येथे होणाऱ्या ऐतिहासिक शहिदी समागम कार्यक्रमास जिल्ह्यातील सीख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधीव मोहियाल व इतर सर्व समाजबांधवाना उपस्थित राहण्याबाबत जिल्हा प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. सर्वांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित रहावे. हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्यातील नांदेड, नागपूर व नवी मुंबई जि. ठाणे येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभाग व हिंद-की- चादर श्री गुरू तेग बहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम राज्यस्तरीय समिती, शीख, सिखलकर, बंजारा, लबाना, सिंधी व मोहियाल व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे नांदेड येथे दि.24 व 25 जानेवारी 2026 रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# "प्रसिद्धीच्या हव्यासातून शिळ्या कढीला ऊत" : विक्रमसिंह कळमकर

**पारनेर/ता : (समर्थ गांवकरी)**



गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ शासनाच्या सन २०१९-२० मध्ये ३०५४ मार्ग व पुल विशेष दुरुस्ती अंतर्गत राममा 222 कर्जुले हर्या, वासुंदे, वडगाव सावताळ ते प्रजिमा २५ रस्ता ०/० ते २३/२०० दुरुस्ती करणे - ४२५ लक्ष या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या कामावरून सध्या केलेली उद्घाटनाची धूळफेक ही निव्वळ प्रसिद्धीच्या हव्यासातून केलेली दिशाभूल असून, शिळ्या कढीला जाणीवपूर्वक ऊत आणण्याचा हा केविलवाणा प्रयत्न असल्याची घणाघाती टीका राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पारनेर तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी केली आहे.

तालुकाध्यक्ष कळमकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०१९ साली टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे तत्कालीन सदस्य काशिनाथ दाते सर यांच्या मागणीनुसार, तत्कालीन आमदार विजयराव औटी साहेब यांच्या माध्यमातून चार कोटी पंचवीस लक्ष दुरुस्ती साठी राममा 222 कर्जुले हर्या, वासुंदे, वडगाव सावताळ ते प्रजिमा २५ रस्ता मंजूर करण्यात आला होता. त्याचवेळी दाते सर व औटी साहेब यांच्या उपस्थितीत या रस्त्याचे भूमिपूजनही विधिवत पार पडले होते. मात्र, संबंधित ठेकेदाराच्या कौटुंबिक अडचणींमुळे हे काम प्रलंबित राहिले.

पुढील काळात विद्यमान आमदार काशिनाथ दाते सर यांनी सातत्याने यंत्रणेकडे पाठपुरावा करून ठेकेदाराला काम सुरू करण्यास भाग पाडले. असे असतानाही आज कोणत्याही घटनात्मक किंवा लोकप्रतिनिधी पदावर नसलेल्या कथित पुढाऱ्यांनी ठेकेदार व यंत्रणेची दिशाभूल करत, तब्बल ३ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीचे काम आपणच मार्गी लावल्याचा बनाव उभा केला आहे, असा आरोप कळमकर यांनी यावेळी केला.

या कथित उद्घाटनाच्या गाजावाजामध्ये ज्यांनी प्रत्यक्षात या रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला, पाठपुरावा केला आणि काम सुरू होण्यासाठी झगडले, त्या तत्कालीन लोकप्रतिनिधी माजी आमदार विजयराव औटी साहेबांच्या नावाचा उल्लेख करण्याची साधी तसदीही घेतली नसल्याने सबंधीतांकडून कृतघ्नतेचा कळस गाठत सर्वसामान्य नागरिकांची जाणीवपूर्वक दिशाभूल केली जात असल्याचेही कळमकर म्हणाले.

# कॉलेजच्या पार्किंगमध्ये विद्यार्थ्यावर चाकू हल्ला

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

चास (ता. अहिल्यानगर) शिवारातील आडसुळ कॉलेजच्या बाहेर विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला झाल्याची घटना घडली आहे. प्रशांत दत्तात्रय जाधव (वय-१९, रा. सारंगवस्ती, निमगाव वाघा, ता. अहिल्यानगर) असे जखमी विद्यार्थ्याचे नाव आहे. किरकोळ वादातून हा प्रकार घडला असून, याप्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. जखमी प्रशांत जाधव यांनी फिर्याद दिली. साहिल शेवाळे (रा. वडगाव गुप्ता, ता. अहिल्यानगर) व त्याच्या सोबतच्या अनोळखी दोन मित्रांवर हा गुन्हा दाखल झाला आहे. प्रशांत जाधव हा आपल्या मित्रासोबत महाविद्यालयाच्या पटांगणात बोलत जात होता. त्यावेळी संशयित आरोपी साहिल शेवाळे याने तिथे येत तू मला शिवी का दिली असे म्हणत हुज्जत घालण्यास सुरूवात केली. फिर्यादीने वाद टाळण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपीने त्याला हॉटेलवर येण्याची धमकी दिली. यानंतर प्रशांत हा महाविद्यालयाच्या पार्किंगमध्ये डबा आणण्यासाठी गेला असता, साहिल शेवाळे आणि त्याचे दोन अनोळखी मित्र तिथे आले. तुला भांडण करायचे आहे का? असे विचारत त्यांनी वाद उकरून काढला.यावेळी साहिलच्या एका साथीदाराने कमरेला लावलेला चाकू काढून प्रशांतवर वार केला. तसेच साहिल आणि त्याच्या दुसऱ्या मित्राने फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकरणी प्रशांत जाधव याने दिलेल्या फिर्यादीवरून तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार जंबे करत आहेत.

# समर्थ गुरुकुल वार्षिक क्रीडा स्पर्धेत ४३७ विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**



समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यट संचलित समर्थ गुरुकुल या सी.बी.एस.ई.मान्यता प्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेची वार्षिक क्रीडा स्पर्धा नुकतीच मोठ्या उत्साहात जल्लोषपूर्ण आणि दिमाखदारपणे पार पडली.

स्पर्धेची सुरुवात दिपप्रज्वन व प्रतिमापूजनाने करण्यात आली. समर्थ शैक्षणिक संकुलाच्या संचालिका सारिका ताई शेळके यांच्या शुभहस्ते गुरुकुलच्या क्रीडा ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले.यावेळी छोट्या बालचमुंनी पांढरा,हिरवा,लाल,पिवळा,निळा अशा वेगवेगळ्या प्रकारचे झेंडे हातात घेत मार्च परेड करून क्रीडा ध्वजाला मानवंदना दिली. क्रीडा ज्योत प्रज्वलित करून क्रीडास्पर्धांसाठीचे नियम व अटी याबाबत एक शपथ घेण्यात आली. खेळासाठी भलताच उत्साह आणि स्फूर्ती या लहानग्यांमध्ये संचारली होती.खिलाडूवृत्ती आणि जिद्द या दोन गोष्टी अंगिकारण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध असल्याची शपथ विद्यार्थ्यांनी घेतली.आपल्या चिमुरड्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी पालकवर्ग देखील उपस्थित होता. नर्सरी,ज्युनियर केजी,सिनियर केजी व पहिलीपासून ते १२वी पर्यंतचे सर्वच विद्यार्थी यात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पॉमपॉम, झांज,एरोबिक्स,डंबेल,लेझीम,योगा अशा वैविध्यपूर्ण नृत्य कलाविष्काराने स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

या स्पर्धांचे नियोजन क्रीडा संचालक एच.पी.नरसुडे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षक विनायक वऱ्हाडी, क्रीडा प्राध्यापक राहुल अहिरे,तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक सखाराम मातेले सर यांनी केले व सूत्रसंचालन रामचंद्र मते तर आभार सौ. शितल पाडेकर यांनी मानले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल ताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,प्राचार्य सतिश कुऱ्हे,बी. सी .एस .चे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,डॉ.लक्ष्मण घोलप,पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.अनिल कपिले,आय टी आय चे प्रा.पांडुरंग हाडवळे,समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.संतोष घुले,समर्थ फार्मसी चे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके,ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य वैशालीताई आहेर,अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल चे डॉ.रमेश पाडेकर,यशवंत फापाळे,प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदिप गाडेकर,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालकवर्ग आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिद्द, चिकाटी आणि AI ची संकल्पना शिकत रहा - प्रा. डॉ. धोंडगे

### श्री शिवाजी कॉलेजच्यावतीने बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप




**कंधार : (समर्थ गांवकरी)**

जिद्द, चिकाटी आणि श्रम हेच यशाचे शिखर गाठण्याचे प्रमुख पैलू होत, त्यासाठी विद्यार्थ्यांनी जिद्द - चिकाटी आणि AI ची संकल्पना शिकत राहिल्यास भविष्यात निश्चितच यशाचे शिखर गाठण्यास वेळ लागणार नाही, असे प्रतिपादन प्रा.डॉ. पुरुषोत्तम केशवराव धोंडगे यांनी इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप व भावी शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा देताना केले. दिनांक २० जानेवारी २०२६ रोज मंगळवारी श्री शिवाजी कॉलेज मधील इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना ११ वी च्या विद्यार्थ्यांकडून निरोप देण्या संदर्भात निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव मा.आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे, प्रमुख मार्गदर्शक संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे,तर प्रमुख अतिथी विधी महाविद्यालयाचे प्राचार्य सुनिल आंबटवाड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवराज चिवडे, भिमराव कांबळे, पर्यवेक्षक प्रा. प्रदिप गरुडकर, प्रा.माधव ब्याळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

इयत्ता १२ वी (सायन्स) मधील विद्यार्थी काश्यप कांबळे यांनी सीएलएटी(CLAT) या परीक्षेत देशात १८ वा व राज्यात २ रा क्रमांक मिळवून यश संपादन केल्यामुळे सदरच्या विद्यार्थ्यांचा कॉलेजच्या वतीने सन्मान करण्यात आला तर संस्थेच्या वतीने डॉ.पुरुषोत्म धोंडगे यांनी ५१ हजार रुपयाची अर्थिक मदत केली. मा. आमदार भाई गुरुनाथरावजी कुरुडे आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी म्हणाले शाळा,कॉलेजमधील दिवस हे केवळ अभ्यासापूरतेच मर्यादित नसतात तर येथे मिळालेले शैक्षणिक अनुभव,संस्कार आणि मूल्य हेच आयुष्याचा खरा पाया घडवतात, कॉलेज हे केवळ ज्ञानाचे केंद्र नसून, येथे मिळणारे अनुभव, संस्कार आणि मूल्य हेच आपल्या उज्वल भविष्यासाठी आधारस्तंभ ठरतात. असा विश्वास मा.आ. कुरुडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला.

तालुक्यातील श्री शिवाजी विद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देऊन शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु.अनुष्का गायकवाड हिने केले तर आभार प्रा.अशोक लिंगायत यांनी मानले.यावेळी प्रा.हनमंत वाडकर, प्रा. सुभाष वाघमारे, प्रा. दिलीप सुर्यवंशी, प्रा. सिमा देशमुख, प्रा.वैजनाथ माने, प्रा.प्रदिप कोरे, प्रा. विठ्ठल जामगे, प्रा.राम आडकीने, प्रा.कपील सोनकांबळे, प्रा.विनोद हिपळगावे,प्रा.माधव भिसे, प्रा. ज्योती बारसे, प्रा.किशन पवित्रे, प्रा सचिन कंदरकुंटे,प्रा.अभिजीत बिराजदार, प्रा.कोमल स्वामी,नंदु कुरुंदे,राम देशमुख यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे १५ मार्चला भव्य सामूहिक विवाह सोहळा

- उपक्रमाचे यंदा १३ वे वर्ष
- ५१ जोडप्यांचा विवाह लावण्याचा संकल्प




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक बांधिलकी जपत गरीब व गरजू कुटुंबांना आधार देणाऱ्या भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारा भव्य सामूहिक विवाह सोहळा यंदा रविवार, १५ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती फाउंडेशनचे विश्वस्त राजेश अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी जयकिशन गोयल, सरस्वती गोयल, महावीर रतनलाल गोयल, विनोद अग्रवाल, सीमा अग्रवाल, मनोज अग्रवाल आदि मान्यवर उपस्थित होते.

आजच्या काळात वाढत चाललेल्या सामाजिक व आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर सामूहिक विवाह सोहळे ही काळाची गरज असून, अशा उपक्रमांतून खऱ्या अर्थाने मानवसेवा घडते, असे मत अग्रवाल यांनी व्यक्त केले. हा सोहळा ज्येष्ठ समाजसेवक रतनलाल गोयल यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आला आहे.

ते पुढे म्हणाले की, सध्या विवाह समारंभांवरील अवाजवी खर्चामुळे अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडत आहेत. विशेषतः मुलीच्या विवाहाची चिंता पालकांसाठी मोठे ओझे ठरत आहे. अशा परिस्थितीत सामूहिक विवाह सोहळे समाजात एकात्मता, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीचा सकारात्मक संदेश देणारे ठरतात.

या सोहळ्यात विवाहबंधनात अडकणाऱ्या प्रत्येक जोडप्याला कपाट, पंखा, गादी, चादर, मिक्सर, देव्हारा तसेच भांडी-कुंडी संच असे गृहउपयोगी साहित्य भेटस्वरूप देण्यात येणार आहे. यासोबतच वधू-वरांना संपूर्ण वस्त्रसंच, मंगलसूत्र व आवश्यक वैवाहिक साहित्य देखील प्रदान करण्यात येईल.

# लेनोव्हो तर्फे भारतात नेक्स्ट जनरेशन जीसीसी साठी फुलस्टॅक सेवा संचाची घोषणा



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

प्लॅटफॉर्म इनोव्हेशन,एआय चलित परिवर्तन आणि सिक्युरिटी फर्स्ट इंजिनिअरींग यांसाठी ऑर्केस्ट्रेशन हब्स म्हणून झपाट्याने विकसित होत असलेल्या भारतातील ग्लोबल केपेबिलिटी सेंटर्स (जीसीसी) साठी लेनोव्हो ने फुलस्टॅक सेवा संचाची घोषणा केली आहे.डिजिटल ट्रान्सफॉमेशन ते डिजिटल ऑर्केस्ट्रेशनचा प्रवास करत असलेल्या जीसीसी केंद्रांच्या तंत्रज्ञान विषयक गरजा अधिक स्तरित,सुरक्षित आणि अनुकूलित होत आहेत.या गरजा एज ते क्लाऊड व इन्फ्रास्ट्रक्चर ते इंटेलिजन्स पर्यंत पसरलेले आहे. नुकताच लेनोव्हो ने केलेल्या सर्वेक्षणात एआयचा विस्तार,आधुनिक पायाभूत सुविधा,कार्यबलाची उत्पादकता,अनुपालन,सुरक्षितता आणि शाश्वतता या धोरणात्मक तंत्रज्ञान बदलांचे संकेत अधोरेखित झाले.हे महत्त्वपूर्ण बदल लक्षात घेता लेनोव्हो इंडिया या बदलांमध्ये सेवा देण्यासाठी सज्ज असून भारतातील 1600 हून अधिक जीसीसी केंद्रांसाठी तयार केलेल्या उद्देशानुसार सेवा,फुलस्टॅक एआय सज्ज पायाभूत सुविधांद्वारे मोजता येण्याजोग्या गुंतवणुकीवर परतावा याच्याशी सुसंगत सेवा प्रदान करत आहे. लेनोव्हो तर्फे एआय,पायाभूत सुविधा,कार्यबल आणि सुरक्षितता या सर्वांसाठी जीसीसी केंद्रांना पाठबळ देते. लेनोव्हो तर्फे व्यापक एआय विकासासाठी चालना - संपूर्ण एआय पायाभूत सुविधा आणि ट्रुस्केलचे लवचिक वापर प्रारूप यामुळे कुठल्याही मोठ्या गुंतवणूकीशिवाय जलद रितीने एआयचा वापर शक्य होतो. लेनोव्हो तर्फे जीसीसी आधुनिकीकरणाला पाठबळ - जगातील सर्वांत विश्वासार्ह पायाभूत सुविधांद्वारे व सिध्द आर्किटेक्चर आणि मजबूत इकोसिस्टीम सह एआय क्लाऊड आणि लीगसी प्रणालींच्या सह अस्तित्वासाठी डिझाईन केलेला एंडटूएंड एआय स्टॅक प्रदान करते.

# समुपदेशन मेळावा उत्साहात संपन्न

**श्रीरामपुर : (समर्थ गांवकरी)**

रेशीमगाठी वधू वर व समुपदेशन मेळावा रविवार, दिनांक १८ / ०१ / २०२६ रोजी पुणे या ठिकाणी उत्साहात संपन्न प्रसंगी महाराष्ट्र परीट धोबी सेवा मंडळाचे लॉन्ड्री संघटनेचे कार्याध्यक्ष सन्मा. अनिलजी हुपरीकर संचलित टीम रेशीमगाठी वधू-वर सूचक मंडळ यांच्या वतीने आयोजित उच्चस्तरीय रेशीमगाठी परीट समाज वधू-वर व समुपदेशन मेळावा २०२६ हा कार्यक्रम माऊली मंगल कार्यालय, कात्रज–कोंढवा रोड, पुणे येथे अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान भाजप नेते आदरणीय राजाभाऊ किसनराव कदम यांनी भूषविले.

# खासदार निलेश लंकेंच्या भावाला दोन आठवड्यात पोलिसांसमोर हजर होण्याचे हायकोर्टाचे आदेश ! महिला विनयभंग प्रकरण भोवणार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



महिलेचा विनयभंग करुन तिला जातीवाचक शिवागाळ केल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने खा. निलेश लंके यांचे बंधू दीपक लंके यांच्यासह त्यांच्या इतर दोन समर्थकांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. या प्रकरणातील आरोपी राहुल बबन झावरे, संदीप लक्ष्मण चौधरी आणि दीपक ज्ञानदेव लंके यांनी दाखल केलेले अटकपूर्व जामिनाचे अपील न्यायालयाने फेटाळून लावले. न्यायमूर्ती वाय. जी. खोब्रागडे यांनी दिलेल्या आदेशानुसार, आरोपींना दोन आठवड्यांच्या आत तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

हे प्रकरण पारनेर तालुक्यात आहे. परंतु ते अहिल्यानगर येथील तोफखाना पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आले होते. फिर्यादी महिला ही अनुसूचित जातीतील आहे. फिर्यादीनुसार, 6 जून 2024 रोजी दुपारी बारा वाजेच्या दरम्यान खा. लंके यांचे बंधू दीपक लंके यांच्यासह 24 जण चारचाकी वाहनांमधून फिर्यादीच्या घरासमोर आले. यावेळी आरोपी राहुल बबन झावरे याने फिर्यादीला जातिवाचक शिवीगाळ केली. तसेच फिर्यादी महिलेचे कपडे फाडून तिचा विनयभंग केला. आरोपी तेवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी या महिलेच्या पोटात लाथ मारून तिला बेदम मारहाण केली होती. दीपक ज्ञानदेव लांके आणि संदीप लक्ष्मण चौधरी हेही यात सामील होते.

सत्र न्यायालयाने 14 जूनला या प्रकरणातील आरोपींना जामीन मंजूर केला होता. परंतु त्यानंतर फिर्यादीने याबाबत ओरंगाबाद खंडपीठात धाव घेतली होती. न्यायालयाने फिर्यादीतील आरोप हे प्रथमदर्शनी गंभीर स्वरूपाचे असून, घटना ही फिर्यादीच्या घरासमोर सार्वजनिक ठिकाणी घडल्याचे स्पष्ट होत असल्याचे नमूद केले. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम 3(1)(r) आणि 3(1)(s) अंतर्गत गुन्हा होत असल्याने, अशा प्रकरणात अटकपूर्व जामिनावर कायदेशीर बंदी असल्याचे न्यायालयाने ठामपणे सांगितले.

या प्रकरणात ॲड. आर. डी. राऊत यांनी तर फिर्यादीतर्फे ॲड. ए. डी. ओस्तवाल यांनी जोरदार युक्तिवाद केला. आरोपींच्या वतीने ॲड. आर. आर. करपे यांनी बाजू मांडली. अखेर, उच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेला तात्पुरता अटकपूर्व जामीन रद्द करत, राहुल बबन झावरे, संदीप लक्ष्मण चौधरी आणि खा. निलेश लंके यांचे बंधू दीपक ज्ञानदेव लंके यांना दोन आठवड्यांत आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले.

# रणबीर कपूर सोबत 'पीएनजी ज्वेलर्स'चा 'परंपरा आणि आधुनिकते'चा नवा अध्याय

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



१८३२ पासूनचा समृद्ध वारसा जपणारा भारतातील एक अग्रगण्य दागिन्यांचा ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स'ने बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता रणबीर कपूर याची नवा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. परंपरेची जाण, आकर्षकता आणि विश्वासार्हता यांचा सहज संगम असलेला रणबीर कपूर 'पीएनजी ज्वेलर्स'च्या प्रवासातील एक रोमांचक नवा अध्याय ठरणार असून, यामुळे ब्रँडची राष्ट्रीय पातळीवरील उपस्थिती अधिक भक्कम करणार आहे. महाराष्ट्राच्या मातीतून सुरू झालेले आणि आज भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर आत्मविश्वासाने विस्तार करत असलेले 'पीएनजी ज्वेलर्स' डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे. रणबीर कपूरसोबतची ही भागीदारी ब्रँडच्या उत्क्रांतीचे प्रतीक असून, विश्वास, कारागिरी आणि वारसा या मूल्यांशी असलेली नाळ अधिक दृढ करते. बॉलिवूडच्या दिग्गज कपूर घराण्याची परंपरा पुढे नेत, रणबीर कपूरने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. रणबीरचा प्रचंड चाहतावर्ग आणि सिनेसृष्टीतील वारसा 'पीएनजी ज्वेलर्स'च्या विविध वयोगटांतील ग्राहकांपर्यंत पोहोच वाढवण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. हा करार जानेवारी २०२६ पासून सुरू होणार असून, रणबीर कपूर विद्यमान ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून 'पीएनजी ज्वेलर्स'चे प्रतिनिधित्व करणार आहे. या सहकार्याचा मुख्य उद्देश राष्ट्रीय स्तरावर ब्रँडची दृश्यमानता वाढवणे, विश्वास अधिक दृढ करणे आणि एंडोर्समेंट्स, ॲडव्होकेसी तसेच ब्रँड-नेतृत्वाखालील उपक्रमांद्वारे 'पीएनजी ज्वेलर्स'चा वारसा अधिक व्यापकपणे पोहोचवणे हा आहे. या भागीदारीसोबत कोणत्याही विशिष्ट कलेक्शनचा लॉन्च नसला, तरी हा करार ब्रँडच्या दीर्घकालीन राष्ट्रीय स्तरावर रिटेल विस्तार धोरणाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

या सहकार्याविषयी बोलताना अभिनेता रणबीर कपूर म्हणाला, "पीएनजी ज्वेलर्स हा पिढ्यान्पिढ्यांचा वारसा जपणारा आणि विश्वास व मूल्यांवर उभा असलेला ब्रँड आहे, ज्याचा मी मनापासून आदर करतो. परंपरेचा सन्मान करत भविष्याकडे आत्मविश्वासाने वाटचाल करणाऱ्या या ब्रँडचा भाग होणे माझ्यासाठी अतिशय आनंदाचा क्षण आहे आणि या प्रवासाचा मी अभिमानाने भाग बनत आहे."

या भागीदारीबद्दल आपला आनंद व्यक्त करताना 'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, "रणबीर कपूर यांचे व्यक्तिमत्त्व परंपरेचा आदर राखत आधुनिकतेकडे आत्मविश्वासाने वाटचाल करणारे आहे. जसा पीएनजी ज्वेलर्सने आपल्या मुळांशी निष्ठा राखत काळानुसार स्वतःला विकसित केले आहे, तसेच रणबीर कपूरने एका आयकॉनिक वारशाला प्रामाणिकपणे आणि सुसंगततेने पुढे नेले आहे.

# प्रजासत्ताक दिन सोहळा कळंबोली पोलीस मुख्यालय मैदानावर

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारताच्या 77 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त कोकण विभागीय मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ सोमवार, दि.26 जानेवारी 2026 रोजी विभागीय आयुक्त डॉ.विजय सुशिला नामदेव सूर्यवंशी यांच्या हस्ते कळंबोली, सेक्टर 17 येथील पोलीस मुख्यालय मैदान येथे सकाळी 9.15 वा.संपन्न होणार आहे. ध्वजारोहणाच्या वेळी राष्ट्रीय/समारंभीय पोषाख परिधान करण्यात यावा. ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी 8-30 ते 10 वाजेदरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये.

# बंगळुरूतील दुचाकीस्वार अधिक घाबरून ब्रेक लावतात; कोलकात्यात हॉर्नचा गजर सर्वाधिक

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



देशातील इलेक्ट्रिक दुचाकीस्वारांच्या प्रवासातील सवयींवर प्रकाश टाकणाऱ्या एथर एनर्जीच्या २०२५ अखेरच्या प्रवास निरीक्षणांतून शहरानुसार वाहन चालविण्याच्या पद्धतींमध्ये मोठा फरक दिसून आला आहे. देशभरातील पाच लाखांहून अधिक कनेक्टेड एथर स्कूटर्सच्या एकत्रित माहितीतून हे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. या आकडेवारीनुसार बंगळुरूतील वाहनचालक मुंबईतील चालकांपेक्षा जवळपास चौपट अधिक वेळा अचानक ब्रेक लावतात. यावरून बंगळुरूतील वाहतुकीतील अनिश्चितता आणि वारंवार थांबा-चालवा परिस्थिती स्पष्ट होते. या अभ्यासातून असेही दिसून आले की, दुचाकीस्वारांचा दैनंदिन प्रवास आता सॉफ्टवेअरवर अधिक अवलंबून होत आहे. प्रवासातील सवयी, सुरक्षिततेसाठीचे हस्तक्षेप आणि चालकांचे वर्तन यामध्ये एक ठराविक पद्धत तयार होत असल्याचे या निरीक्षणांतून पुढे आले आहे. एथर एनर्जीचे मुख्य व्यवसाय अधिकारी रवनीत फोकेला यांनी सांगितले की, भारतात दुचाकी हे सर्वाधिक वापरले जाणारे वैयक्तिक वाहन असले तरी चालक वाहन कसे चालवतात, याची माहिती आतापर्यंत मर्यादित होती. मात्र, नव्या तंत्रज्ञानामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि सुसूत्र होत असल्याचे हे निरीक्षण दाखवून देते.

शहरानुसार हॉर्न वाजवण्याच्या सवयींमध्येही लक्षणीय तफावत दिसली. कोलकात्यातील चालक देशात सर्वाधिक हॉर्न वाजवतात. येथे सरासरी ताशी १३१ वेळा हॉर्नचा वापर होतो. यावरून वाहतुकीची घनता आणि आक्रमक संकेतांची सवय लक्षात येते. याउलट, पुणे आणि हैदराबाद ही शहरे तुलनेने शांत असल्याचे आढळले असून येथे वाहन चालविण्याचे वातावरण अधिक पूर्वानुमेय असल्याचे संकेत मिळतात.

# सिप्लाची हॅशटॅग इनहेल द चेंज मोहीम; रवीना टंडन यांचा सहभाग

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतात मधुमेह हे एक गंभीर सार्वजनिक आरोग्य आव्हान बनले असून, आजही उपचारांशी संबंधित भीती, गैरसमज आणि भावनिक अडथळे यामुळे अनेक रुग्ण प्रभावी उपचारांपासून दूर राहतात. या पार्श्वभूमीवर मधुमेह उपचारांबाबत जागरूकता वाढवण्यासाठी आणि इन्सुलिन थेरपीशी निगडित मानसिक अडथळे दूर करण्यासाठी सिप्ला कंपनीने हॅशटॅग इनहेल द चेंज ही देशव्यापी जनजागृती मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमात बॉलिवूड अभिनेत्री रवीना टंडन सहभागी झाली आहे. या संदर्भात सल्लागार एंडोक्राइनोलॉजिस्ट व मधुमेहतज्ज्ञ डॉ. हर्षल एकतपुरे म्हणाले, "रुग्णांच्या चिंता समजून घेणे आणि त्यावर सोपे, सुलभ उपाय देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हॅशटॅग इनहेल द चेंज सारखे रुग्ण-केंद्रित जनजागृती उपक्रम क्लिनिकल माहितीबरोबर भावनिक आधार देतात. त्यामुळे उपचारांबद्दलची भीती कमी होऊन रुग्णांचा विश्वास वाढण्यास मदत होते." ते पुढे म्हणाले, "टाइप १ मधुमेहात इन्सुलिन अत्यावश्यक असते, तर टाइप २ मधुमेहातील अनेक रुग्णांसाठीही ते महत्त्वाचे उपचार आहे. मात्र, इंजेक्शनची भीती, गुंतागुंतीची दिनचर्या आणि सामाजिक गैरसोय यामुळे रुग्ण उपचारांपासून दूर राहतात. नवीन इन्सुलिन वितरण पर्याय उपलब्ध होत असले तरी, त्यांना प्रभावी रुग्ण-संवाद आणि सततच्या समर्थनाची जोड दिल्यासच खरा बदल घडू शकतो."

# आयसीसी मेन्स टी वर्ल्ड कप २०२६चा रोमहर्षक अनुभव देणार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मॅरियट बोनव्हाय हा मॅरियट इंटरनॅशनलचा पुरस्कार-प्राप्त ट्रॅव्हल प्लॅटफॉर्म यंदा फेब्रुवारीमध्ये सदस्यांना क्रिकेटचा आनंद देणार आहे, ज्यासह त्यांना आगामी आयसीसी मेन्स टी वर्ल्ड कप 2026चा रोमहर्षक अनुभव मिळेल. मॅरियट बोनव्हायच्या इंटरनॅशनल क्रिकेट कौन्सिल (आयसीसी) सोबत जागतिक सहयोगाचा भाग म्हणून सदस्य विशेषत: भारतात व श्रीलंकेमध्ये आयोजित करण्यात आलेल्या इव्हेण्टसाठी डिझाइन करण्यात आलेल्या 500 हून अधिक सर्वोत्तम मॅरियट बोनव्हाय मोमेण्ट्सचा आनंद घेऊ शकतात. दोन भाग्यवान सदस्यांना मॅरियट बोनव्हाय गोल्डन तिकिटासह अद्वितीय अनुभव मिळेल, जेथे दोन व्यक्तींना स्टाइलमध्ये आयसीसी मेन्स टी वर्ल्ड कप 2026 फायनल्स पाहण्याची सुवर्णसंधी मिळेल. एक गोल्डन तिकिट मॅरियट बोनव्हाय पॉइण्ट्ससह सर्वाधिक बोली लावणाऱ्या सदस्याला देण्यात येईल, तर दुसरे गोल्डन तिकिट जागतिक मॅरियट बोनव्हाय स्वीपस्टेकच्या विजेत्याला मिळेल. सदस्य नसलेले मोफतपणे सदस्य बनण्यासाठी साइन अप करू शकतात आणि येथे (here) मॅरियट बोनव्हाय गोल्डन तिकिट जिंकण्याची संधी मिळवू शकतात. सदस्य त्यांच्या मॅरियट बोनव्हाय पॉइण्ट्सचा वापर करत 500 हून अधिक मॅरियट बोनव्हाय मोमेण्ट्ससाठी बोली लावू शकतात किंवा पॉइण्ट्स रिडिम करू शकतात.




यामध्ये मॅचडे मॅरियट बोनव्हाय हॉस्पिटॅलिटी एक्स्पीरिअन्सेस, सामन्यापूर्वी बियॉण्ड द बाउंड्री एक्स्पीरिअन्सेस किंवा मॅरियट बोनव्हाय अॅन्थेम किड्स एक्स्पीरिअन्सेस यांचा समावेश आहे, जेथे ते त्यांच्या मुलांसोबत संस्मरणीय आठवणी निर्माण करू शकतात, राष्ट्रगीतादरम्यान खेळाडूंसोबत मैदानावर जाऊ शकतात. आजपासून, मॅरियट बोनव्हाय मोमेण्ट्स जगभरातील सदस्यांना ऑनलाइन येथे उपलब्ध असतील. प्लॅटफॉर्मवर नियमितपणे नवीन अनुभव लाँच करण्यात येतील, यामध्ये भारत व पाकिस्तान यांच्यामधील बहुप्रतिक्षित सामन्याकरिता सामान्य प्रवेश तिकिटांचा समावेश असलेल्या 1-पॉइण्ट ड्रॉप्सचा समावेश आहे. दहा 1-पॉइण्ट ड्रॉप्स मिळवण्याची संधी आहे, जे 2 फेब्रुवारी 2026 राजी सिंगल मॅरियट बोनव्हॉय पॉइण्टसाठी रिडिम करता येऊ शकतात. मॅरियट बोनव्हाय व्यक्तींना आवडणाऱ्या गोष्टींच्या, प्रेरित करणाऱ्या ठिकाणांच्या जवळ नेते, तसेच महत्त्वपूर्ण क्षणांचा आनंद देते. आयसीसीसोबत आमच्या जागतिक सहयोगाच्या माध्यमातून आम्ही अत्यंत संस्मरणीय पद्धतीने आयसीसी मेन्स टी वर्ल्ड कप 2026 चा रोमहर्षक अनुभव देण्यास सज्ज आहोत.

पुढील रांगेमधील सीट्स व पडद्यामागील घडामोडींपासून प्रीमियम आदरातिथ्य, पालक व मुलांमधील उत्साहवर्धक अनुभव आणि आमच्या मॅरियट बोनव्हाय हॉटेल्सच्या पोर्टफोलिओमधील स्टेपर्यंत आम्ही संस्मरणीय आठवणी निर्माण करत आहोत, ज्या या वर्ल्ड कपच्या अंतिम सामन्यानंतर देखील कायम राहतील, असे मॅरियट इंटरनॅशनलचे चीन वगळता आशिया पॅसिफिकमधील चीफ कमर्शियल ऑफिसर जॉन टूमी म्हणाले.